In 1181 and 1182 Fasli, Madhav Rao I told Narayan Rao that Raghunath Rao would not allow him to rule securely unless he was persuaded to go to the North on expeditions.

The debt accruing from the *regime* of Nana Saheb and Bhau Saheb was to be paid; hence Madhav Rao gave promissory notes of two crores and eighty five lakhs to the bankers.

The total revenue of the State, including the incomes of the Scindia, the Holkar and the Bhonsla, was calculated at thirteen or fourteen crores.

Madhav Rao died. His wife Ramabai offered herself as *sati*. Narayan Rao became the Peshwa.

In 1183 Fasli, Narayan Rao Peshwa was murdered by the *gardis*. Raghunath Rao was placed under such restraints that he was practically a prisoner. Provisions for his expenditure were reduced. He was not allowed to see anybody freely nor was anybody else allowed to see him. Sakharam Bhagawant's advice in the matter was also neglected by Narayan Rao. Sumer Singh, one of the chiefs of the *gardis* was asked to " seize " Narayan Rao by force. Anandi Bai, the wife of Raghunath Rao, caused a change in the wording from ' seized ' to ' killed ', through her adopted son, Amrit Rao. All had been away from the palace under some pretext or the other. When the *gardis* began to crowd into the palace Hari Ballal asked Narayan Rao whether the roll-call of the *gardis* was going to be taken. He learnt that there were no instructions regarding this issued by him. Haripunt disappeared from the scene. Gangabai, the wife of Narayan Rao had been invited to a dinner at Sathe's. Chapajee Tilekar, the most trusted attendant of Narayan Rao, asked his master to run to the residence of Nana by a secret door. Tulya Pawar, another attendant, was bought over by the conspirators. Narayan Rao did not like the advice of Chapajee Tilekar, and dragged by the hand of Death, as it were, he moved towards Raghunath Rao's apartments. Raghunath Rao had come out of his chamber. Narayan Rao rushed to his uncle and held on to him by the waist, crying for protection. Sumer Singh ran after him. Raghunath Rao said something to ward off Sumer Sing, but he completely disregarded him. Narayan Rao was pulled by the leg but Chapajee covered him with his body. Sumer Singh flourished his sword and cut both of them down to pieces. This tragic news spread at once and there was nothing but confusion everywhere. Jayavant Rao Nana conducted Gangabai from Sathe's residence to his own house. Trimbak Rao Mama ordered the cannons to be dragged out and set at ready. Sakharam Bapu, Moroba Dada and Nana Phadnis assembled together to inquire what the matter was. Bapu said he did not know with whose consultation the plot

of seizing Narayan Rao was hatched. He appeared very grief-stricken and began to shed tears. Nana said that he knew full well that Bapu alone was responsible for this outrage. An attendant was dispatched into the palace to find out the real details of what had happened. The messenger brought the news that Narayan Rao had been murdered. This news stunned Sakharam Bapu and cast a cloud of grief on every one. Nana convinced Bapu by producing evidence that Bapu was one of the men in the plot. Bapu was put to shame and confessed his guilt. Securing sanction from Raghunath Rao, who also was shocked to see how events had taken such an unexpected turn, the dead body of Narayan Rao was consigned to flames. Next day, Nana and Bapu met together and found that Gangabai was safe and that she was *enceinte.* They swore allegiance to her. Nana warned Bapu to be true to his word. Raghunath Rao came to know that no one had come to attend the Court. He sent for Bapu and Moroba Dada and expressed bitter regret for the unanticipated turn of events and desired that things should run smoothly. Nana Phadnis also was called but he sent word that as Moroba Dada was there, his own presence was not particularly necessary. Trimbak Rao Mama was instructed by Nana to conduct Gangabai to the fort of Purandar and to look after her safety. Trimbak Rao had a force of twenty-five thousand under him. Bapu had given his consent for this arrangement. Dada became deeply suspicious of this arrangement. Nana endeavoured to secure the support of Mahadajee Scindia and Tukojee Holkar. Moroba Dada also was informed of this. Ram Sastri was consulted by Raghunath Rao Dada regarding the expiation of the sin in connection with Narayan Rao's murder. The inquiry resulted in something very disagreeable to Dada Saheb; hence Ram Sastri repaired to Wai. The Nawab had appropriated territory worth fifty-five lakhs of rupees. Hence Raghunath Rao proceeded to Bidar, with Bapu, Nana and Moroba Dada. The *sanads* given by the Nawab were returned and he was asked not to be in league with Trimbak Rao and Gangabai, who had plotted against the central power. Grand receptions were mutually exchanged. Nana pretended illness and sought leave to go, and Bapu and

Moroba too followed suit. There was Chintopant, the trusted *karabhari* of Dada Saheb, to advise him. Nana, Bapu and Moroba Dada went to Purandar. Trimbak Rao went ahead to receive them. The Scindia and the Holkar also sought leave to go to the North but they proceeded upto the Godavari and lingered there. Raghunath Rao realized that the tables were turned against him. A battle took place between Trimbak Rao Mama and Raghunath Rao near Patadur. Trimbak Rao's army was entirely made up of raw recruits. Consequently he was defeated. He died at Khadakat. Raghunath Rao proceeded to the North. The command of the army was entrusted to Haripunt on whom robes of honour etc., were conferred. Haripunt began to pursue Raghunath Rao, who was followed by Nizam Ali Khan. At Burhanpur the Nawab changed his course and turned towards the Berars. Raghunath Rao carried the *zari patka* banner, and had some privileged persons with him. Nana had their houses searched and their property confiscated. The men under Raghunath Rao threatened to join Haripunt unless he advanced to Poona to punish Nana. Those who joined Haripunt had their houses and property restored. Sumer Singh also left Dada Saheb. Haripunt seized him and burnt him alive by tying rags to his body and setting fire to them. Raghunath Rao then proceeded to Manajee Phakde, Ghadge and Ranojee. Tulya Pawar was caught and punished by Nana. All affairs of the state at the time were being managed in the name of Gangabai.

Mohummad Ali alias Wala Jah was imprisoned by the English and the whole of his territory was annexed by them to defray his debts.

In 1184 Fasli, a son was born to Gangabai and named Sawai Madhav Rao. At this, Bapu, Nana and Moroba Dada were greatly pleased. Sugar was distributed to celebrate the birth of the child. Rukn-ud-Daula, the Diwan of the Nawab went to Alajapur. The Nawab began to manage

his own affairs independently............................Dhondo Shankar'..................................began to manage affairs.

The Nawab sent robes of honour and jewellery to Madhav Rao II, through Nanajee Shankar. Nanajee Shankar, on that occasion, left Haibat Rao Gopal at Purandhar to discharge the duties associated with *akhbarnawisi.*

In 1185 Fasli, Moroba Dada desired to imprison Nana and Bapu and manage all affairs himself. Nana got the scent of the matter and had him imprisoned instead in the fort of Ahmadnagar.

Jivajee Raghunath was appointed as a *vakil* of the Peshwa at Hyderabad, though Krishna Rao Ballal was the chief person responsible for the negotiations between the Nizam and the Marathas.

Negotiations were being carried on between Bapu and Raghunath Rao Dada. Some phrases in the letters indicated that if Dada came into the Deccan, Nana may be seized and imprisoned. Through Mahadajee Scindia Nana acquired full evidence to incriminate Sakharam Bapu whom he imprisoned in the fort. Haripunt Phadke and Ganeshpunt Behre followed Dada and endeavoured their utmost to win him over. Dada, notwithstanding all this, went to Surat. The Behre was posted there while Haripunt came into the Deccan...............

1186 Fasli..

Towards Haidar Naik...

प्रास्ताविक

हैद्राबाद सरकारनें कांहीं वर्षांपूर्वी दक्षिणचा त्रिखण्डात्मक इतिहास प्रसिद्ध करण्याचें ठरविलें होतें. प्राचीन आणि मध्ययुगीन खण्ड सोडले आणि फक्त अर्वाचीन इतिहासाचाच विचार केला म्हणजे दख्खनमध्यें मराठे आणि निजाम यांचा संघर्ष हाच या भागाचा मुख्य विषय ठरतो. अर्वाचीन इतिहासाचा खण्ड लिहिण्याचें काम नवाब अलीयावरजंग यांनीं स्वीकारिलें होतें आणि त्यांची दृष्टी विशाल असल्यामुळें, इतिहास म्हणजे कल्पनाविलास आणि प्रचार नव्हे, तर समकालीन सर्वांगीण लिखित पुराव्यावरून तयार केलेलें सुसूत्र निवेदन हें त्यांना सुविज्ञात होतें. त्यांनीं आसफजाही निजामांच्या घराण्याविषयीं मराठी अस्सल कागदपत्रांत जे उल्लेख आहेत त्यांचें संकलन करण्यास प्रारंभ केला. मराठी मुद्रित साधनग्रंथांच्या नंतर अमुद्रित अशा हस्तलिखितांतूनही जो कांहीं पुरावा उपलब्ध होईल तोही मिळविणें आवश्यक भासूं लागलें. हैद्राबाद सरकारकडे दफ्तरे दिवानी व माल नांवाचा एक मोठा दफ्तरखाना आहे आणि त्या खात्यांत फारशी कागदपत्रांच्या बरोबर मराठी कागदही आहेत त्यांची तपासणी व छाननी करावी या हेतूनें मराठी कागदपत्रांच्या संशोधनाचें काम सुरू करण्यांत आलें. या कामाचें प्राथमिक मार्गदर्शन करण्यासाठीं रियासतकार रा. ब. गो. स. सरदेसाई, बी. ए. यांना बोलावण्यांत आलें होतें. उस्मानिया विद्यापीठांत ते गेले असतांना त्यांना तेथील हस्तलिखितांचा संग्रह दाखविण्यांत आला. त्या वेळीं ही मोडी बखर त्यांच्या अवलोकनांत आली. त्यांनीं ती वाचली आणि तिजविषयींचें आपलें मत त्यांनीं एका रिपोर्टाच्या द्वारें नमूद केलें.

उस्मानिया विद्यापिठातर्फे कै. वा. प्रो. चिं. नी. जोशी, एम्. ए. यांनीं एक दोन वर्षें उन्हाळ्याच्या सुट्टींत कागदपत्रांचें संकलन करण्यासाठीं मराठवाड्यांत दौरे केले होतें त्यावेळीं त्यांना ही मोडी बखर परभणी जिल्ह्यांतील सनपुरी गांवीं आढळली आणि ती त्यांना माणिक गणेश केन्द्रेकर नांवाच्या गृहस्थानीं दिली. हें हस्तलिखित केवळ वाङ्मयीन नसल्यामुळें इतिहासाचार्य सरदेसायांच्या अवलोकनानें तिला महत्त्व चढलें. या मोडी बखरीचें नंतर येथील दफ्तरे दिवानी खात्याच्या मराठी शाखेंत सोपपत्तिक परिशीलन करण्यांत आलें. बखरीचें

नागरीकरण, इंग्रजी भाषांतर, कठिण शब्दांचा अर्थ इत्यादि तयार झाल्यावर, उस्मानिया विद्यापीठाचे उपकुलपती नवाब अलीयावरजंग बहादुर यांनीं दफ्तरे दिवानी खात्याला तिच्या प्रसिद्धीकरणास अनुमति दिली याबद्दल सदर खातें त्यांचे ऋणी आहे हें नमूद करण्यास आनंद वाटतो.

आधारग्रंथांच्या मूल्यमापनांत बखरींना दुय्यम प्रतीचें स्थान असतें हें इतिहासज्ञांस माहीत आहेच परंतु अस्सल कागदपत्रांच्या नंतर परंपरेच्या चाळणींतून दन्तकथांच्या रूपानें जें वाङ्मय अवशिष्ट राहतें तेंही एका दृष्टीनें मनोरंजक आणि उपयुक्त असतें. एखाद्या वस्तूचें सम्यग्दर्शन प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर तिला जितक्या तऱ्हेनें पाहतां येईल तितक्या तऱ्हेनें पाहणें चांगलें. याचसाठीं राष्ट्राचा इतिहास दर पंचवीस वर्षांनीं पुनः पुनः तयार करावा असें एका विचारवंतानें म्हटलें आहे. ऐतिहासिक घटनांचें सत्याधिष्ठित लेखन या दृष्टीनें बखरी कमी महत्त्वाच्या असल्या तरी मानवी मनाचें यथार्थ ज्ञान करून घेण्याच्या दृष्टीनें त्यांचें महत्त्व कमी नाहीं. सव्वाशे वर्षांपूर्वीच्या मराठी गद्याचा जुन्या महाराष्ट्रांतील नमुना या दृष्टीनें या बखरीचें वैशिष्ट्य निरपवाद आहे.

या बखरीच्या रचनाकालाचा विचार करण्यास बखरींत कांहींच अस्सल पुरावा नाहीं. उस्मानिया विद्यापीठांतल्या बखरीच्या प्रतीचीं कांहीं पहिलीं व शेवटलीं पानें निखळलेली आहेत. परंतु, भारत इतिहास संशोधक मंडळाच्या शके १८३७ सालच्या तृतीय संमेलन वृत्तांत सरदार गं. ना. मुजुमदारांचा “ बाळाजी विश्वनाथाविषयीं नवीन माहिती ” या शीर्षकाचा एक लेख आला आहे. त्यांत या सनपुरीच्याच एका प्रतीचा कांहीं भाग दिलेला दिसला. या लेखाच्या शेवटीं “ बखरींतील जरूर तेवढा भाग खालीं दिला आहे ” अशी टीप देऊन मूळ बखरींतील एक मोठा उतारा प्रसिद्ध केला आहे. या उताऱ्यांतील पहिल्या बावन ओळी विद्यापीठाच्या प्रतींत उपलब्ध नाहींत परंतु नंतरच्या सुमारें २१० ओळी प्रस्तुत प्रतींतील मजकुराशी जवळ जवळ तंतोतंत जुळतात. सरदार मुजुमदारांच्या शीर्षकाचा झोक असा आहे कीं त्यांच्याजवळ संपूर्ण बखर असावी. आम्हीं त्यांच्याशीं या बाबतींत पत्रव्यवहार करून पुढील माहिती महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्याकडून मिळविली. बखर महामहोपाध्यायांनींही पाहिली नव्हती. सरदार मुजुमदारांचे एक उत्साही मित्र पी. एन्. पटवर्धन यांनीं तीं त्यांच्याकडून मागऊन घेतली होती. श्रीयुत पटवर्धन हे प्रवास करीत असतांना प्लेगनें आजारी

होऊन वारले. त्यांच्या इतर कागदपत्रांबरोबर बखरही नामशेष झाली. या दुर्दैवी घटनेमुळें दोन्ही प्रतींच्या तुलनेचा अथवा प्रारंभ आणि शेवट यांच्या निश्चितीचा प्रयत्न अशक्य झाला. आमच्या मतें तृतीय संमेलन वृत्तांत उद्धृत केलेल्या मजकुराच्या पूर्वींचा फारसा मजकूर गहाळ झाला नसावा.

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या चालकांनी विशेषतः महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यानीं त्यांच्या तृतीय संमेलन वृत्तांत प्रसिद्ध झालेला मजकूर सनपुरीच्या बखरीच्या प्रारंभाला छापण्याची उदार अंतःकरणानें परवानगी दिली याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. बखरींतील घटनांच्या निवेदनावरून लेखक आसफजाही राजांच्या हितचिंतकांपैकीं आणि आश्रितांपैकीं असला तरी मराठ्यांच्या इतिहासाबद्दल असलेला त्याचा जिव्हाळा बराच जागृत दिसतो. त्यामुळें इ० स० १८१८ च्या नंतर किंवा आगेमागें आठदाहा वर्षांत लिहिलेली ही बखर असावी असें वाटतें. इंग्रजांचा पुण्यास अमल बसल्यानंतर फार काळपर्यंत मराठ्यांचा पराक्रम निजामी महाराष्ट्रांतल्या मराठ्यांच्या अंतः-करणांत स्फुरत राहिला असेल असें मानतां येणार नाहीं.

प्रस्तुत बखरीचा प्रारंभ छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर होऊन शेवट सवाई माधवरावांच्या पांचसाहा वर्षांच्या कारकीर्दीपर्यंतच झाला आहे. बखरीच्या १४१ व्या पानावर पुढील उल्लेख आहे: “ माधवरावसाहेब याहास जेवाहीर व वस्त्रें नवाबाणी नानाजी शंकर याज बे॥ र प॥ ले तें वेळेस अखबार नवीसीचे कामावर पुरंधरास नानाजीपंतानी हैयबतराव गोपाळ यास ठेविले. ” नानाजी शंकर (१७३० ते १७८५) हे मशीरुलमुल्क अजमुल उमरा हा खड्र्याच्या लढाईनंतर पुण्यास ओलीस असतांना निजाम अलीखांचे मुख्य प्रधान बनलेल्या राय रेणुकादास शामराज यांचे चुलते होत. हैबतराव गोपाळ यांनीं पुण्याहून जीं बातमीपत्रें पाठविलीं आहेत तीं विस्तृत आणि माहितीनें भरलेलीं आहेत. त्यांचे एकदोन संग्रह लवकरच दफ्तरे दिवानी खात्यातर्फे प्रसिद्ध होणार आहेत. हैबतरावांचे पुत्र रघोत्तमराव हेही मोठे राजकारणी आणि विद्याप्रेमी मुत्सद्दी होते. त्यांच्या कालांत ही बखर तयार झाली असावी असा आमचा तर्क आहे.


या बखरीमध्यें इतर सर्व बखरींप्रमाणेंच कालविपर्यासाचे दोष आहेत. बाळाजी विश्वनाथासंबंधीची माहिती तर कादंबरीसारखी अपूर्व आहे. औरंगजेब बाद-शाहानें शाहू महाराजांना कैद केलें ही मराठे आणि मोंगल यांना अनुक्रमें हीन


आणि दोषी ठरविणारी घटना बाळाजी विश्वनाथाच्या सहाय्यानें सर्वांसच मोठीं भूषणावह होईल अशा पद्धतीनें वर्णिली आहे. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेबानें त्यांच्या लहानशा मुलाला कैद करण्याची निष्ठुरता दाखविली असा आरोप करणारे इतिहासकार बखरकारानें पूर्वग्रहदूषित आहेत असें ठरविलें आहे. छत्रपतींची हत्या झाल्यावर मराठे सरदारांना त्यांच्या अल्पवयी बालकाचें सुद्धां म्हणजे आपल्या राष्ट्राच्या आगामी सम्राटाचें रक्षण करतां आलें नाहीं असा आरोप कोणाला मराठ्यांवरही करता येणार नाहीं, कारण, सर्वत्र माजलेल्या अंदाधुंदीत या लहानश्या राजपुत्राचा जीव कसा वांचवावा याची चिंता वाटूनच बाळाजी विश्वनाथानें शाहूमहाराजांना त्या कालच्या महाराष्ट्रांतील किंबहुना साऱ्या हिंदुस्थानांतील अत्यंत सुरक्षित स्थळीं म्हणजे औरंगजेबाच्या राणिवशांतच दाखल केलें. औरंगजेबाचे आपल्या कन्येवर अतिशय प्रेम असल्यामुळें त्यानें आपण होऊन कौतुकानें तुझा कोणता मुलगा आहे पाहूं असा उल्लेख केला आहे. याच घटनेंत बखरकाराचा थोडा स्थलविपर्यासही झाला आहे.


विजापूर आणि गोवळकोंडा हीं राज्यें नष्ट करण्यासाठीं औरंगजेब जो दक्षिणेंत आला (१६८१ ते १७०७) तो मृत्यूपर्यंत उत्तरेंत गेला नाहीं परंतु बखरींत तो दक्षिणेंतून दिल्लीस गेला असा उल्लेख आहे. बखरकाराचे हैदरजंग या बूसीच्या दुभाष्याच्या मृत्यूचें वर्णन आणि राक्षसभुवनच्या लढाईचें वर्णन हीं दोन्हीं मोठीं सुरम्य आहेत. हैदरजंगाच्या खुनामध्यें निजाम अलीखांचा हात होता ही गोष्ट बखरकारानें स्पष्टपणें सांगितली आहे. नारायणराव पेशव्यांच्या खुनानंतर रघुनाथराव दादांनीं निजाम अलीखांचे साहाय्य घेऊन पेशवेगिरी पटकाविण्याचा प्रयत्न केला होता परंतु नारायणरावाला पुत्र झाला असून तो गादीवर बसला आहे हें पाहातांच निजाम अलीखानें सवाई माधवरावाचा गौरव केला ही गोष्ट निजाम अलीखांस मोठी भूषणावह झाली असा बखरीचा सूर आहे.


रघोत्तमराव आणि रायरायान घराण्यांतील कागदपत्रांचा कसून शोध करून सुद्धा या सनपुरी बखरीची संपूर्ण प्रत कोठें आढळूं शकली नाहीं. उत्तरार्धांत या बखरीमध्यें आसफजाही घराण्याच्या पुढील राजांचा इतिहास येण्याचा सुद्धां संभव होता. अद्यापीही प्रयत्न चालूं ठेवल्यास हा शोध यशस्वी होईल कीं काय हें सांगतां येत नाहीं.

रघुनाथ मुरलीधर जोशी, एम्. ए.,
असिस्टंट डायरेक्टर









सनपुरीची बखर

संभाजीस धरून औरंगाबादेस आणून कैदेत ठेविले महिना दोन महिने
कदेत होते तेथून काढुन पिंजऱ्यात घातले तेथेही चार महिने होता नतर येके
देवसी बातशाहा बोलले कीं हा बदमस्त आहे यास मुसलमान करावा संभाजीनें
उत्तर केले कीं हा तक्तावर बसले म्हणजे आपण तक्तावर बसावे या प्रो होत
होते नंतर बालाजीपंत याचे कागद प्रतिनिधी व पेशवे यास उजागरीने
लागले बातशाहानी मुलास जड जव्हाइरी बहतयेक देत गेले त्याच पाच साहा
वर्षे गुजरली तो येके दिवसी दरबार आम भरला आहे मानसिंग राजे जा••
राव देउलगावकर यास बातशाहा म्हणाले कीं तुम्ही आपली लेक यास देणे
जावराव बोलले कीं मी देणार नाही हजरत बोलले कीं तुमचे जातीचा नाहीं
म्हणोन यास लेक देत नाहींत की कारण काय मा

— तूमे आल्यापासून शभुसिंग जाधव याचे तीर्थरूपापासी चाकर होते
सातआठ वर्षे होते तेथेच त्यास आत्फागिरी मिळाली तो बाना अद्याप
आत्फागिरीचा काळाचा लावितात जाधवराव याजपासून दूर होऊन वामनराव
पेंगले मुख्य प्रधान पेशवे याचे चाकरीस राहिले होते तेव्हा आवध्यानी
मनसुबा केला कीं बालाजी विश्वनाथ यास धरला आगर मारला तरी परभारे
कोकणचा आहे आपला काही आप्त नाही यास पाठवावे याचे सीवाय दु॥

गेला आसता संभाजीचा मा विचार ... त नाही या आदेशात होते तो
येके दिवसी वाण्याचे दुकानीं बसले त्याचे समोर फकीराचा तकीया होता तेथे
शाहा पाच फकीर मीळोन सहाजीचा कारखा ...... शुरु होता तेथे येक फकीर
आपले आपसात बोलो लागला कीं "बादशाहावी चूतिया उसकी जोरु बी
चूतीइ उसकी बेटी वो बी चूतीइ सब चूतीयेच मीले हैं" दुसऱ्याने विचारीले
कीं कसे चुतये तेव्हा सागितले की दक्षिणेकडील मुदसद संभाजी धरुन आणिला
होता त्यास बातशाहा म्हणाले की तू मुसलमान हो त्याणे उत्तर केले कीं तू
आपली लेक देशील तरी होईन बेआदबीचे उत्तर जाले म्हणोन त्याचे डोकेस
मारले हे वर्तमान कोणी बातशाहा याचे लेकीस सांगितले ती म्हणाली की
ज्याणी मागितले तेव्हा तोच नवरा दुसरा करावयाचा नाही हे काही बातशाहास

ठाऊक नाही ती माहलांत बोलली बातशाहा मूल मोठी जाली म्हणोन नवरा पाहावयास लागले तो बातशाहाचे बायकोने सांगितले की तुम्ही नवरा कशास पाहतां लेक काही —

करीत नाही तिचे म्हणणे की संभाजी—तले तोच नवरा आतां लग्न करावयाचे नाही हे बातशाहानी ऐकून लेकीस रुबरु बोलावून आणून सांगितले की ही गोष्ट लौकिकांत चांगली नाही तो मुद्दसद त्याचे प्राणावर आली म्हणून तो बोलला याजवर न जावे लग्न करावे ती एकेना तिचा आग्रहच पाहिला

तेव्हा बातशाहा विदेही होते त्यांणी (१८) *हि रुकार दिल्हा या बाो जे जाले लंग्न राहिले जाणून आम्ही त्यास चूतिये म्हणितो हे अवघे फकीर बोलला ते बाळाजीपंतानी अैकून घतले यास बातनीं लागली नंतर या गोष्टीस आठ पधरा दिवस जाले बेगमचे कुनंबिनीची जमांदारीन कुनबिनीत असील होती तिची भेट घेतली तिला शेभर रुाे नजर केली आणि तिचे घरी जाण्याचा पाठ घातला जाता जाता अेके दिवसी असीलीने विच्यारिले की तुम्ही का येता तुमचे काम काय आहे याणी सागितले की आम्ही उमेदवार आहोत आम्हा (म. फा.) अेक अंडका नाहीं कीं मम्मलत करावी (म. फा.) (१९) चे हवाल बेगमसाहेबासी अर्ज करून हाजरतासी सागोन अेखांदे काम सागवावे याजकरिता आलो तेही बोलले कीं बरे आहे सधि पाहून बोलीन दैव तुमचे ते असेल बेगमची वेंणी घालीत होती आनखींन जाता येता बातनी असीलाचे घरी घेतली की बेगम साोचे म्हणने खंचित लंग्न करीत नाही हे अकून येके दिवसी असीलासी बालले की बेग(म) साावा याचा जेन्मं तरी वेर्थच गेला नवरा जेव्हा नाही मुपस (म. फा.) स नवरा म्हणोनः रांडवपन घालितात त्यास एक तरी करावे की लवकीक आपला हो (म. फा.) सभाजीचे पोरबाळ असलियास त्यास (२०) त्याणी आपलेजवळ आणोन चालवावे असील म्हणाली की तो मुपसंद त्याचे मूल आहेत किवा नाहीत ठाऊक कोन्हास असले तरी नमूद होनार नाहीत त्यास येथे आणितो कोन आनेल यास त्याचे चालवने बेगमसाहेब यास विच्यारावे त्याचे मर्जीस आले हे गोष्ट मनास आल्यास मला नेवून भेटवावे त्याणी अभये दिल्हच्यास मलाही रोजगार नाही आणि

---

* येथून शेवटपर्यंतचा समग्र मजकूर आमच्याकडे उपलब्ध असलेल्या प्रतीस अनुसरून आहे.

तुमच्यानेही सागवत नाही त्यास हे सिधं जाले तरी दक्षेनेंत जाऊन त्याचा शोध करुन घेऊन येतो असलि बोलली की फार बेष आहे या गोष्टीस काही येक दिवस गुरजल्यावर येके दिवसी बेगंम सतोशांत पाहून वेनी घालता वेळेस अर्ज केला की आपंण ती (म. फा.) (२१) भोगिता हा लवकीक जगन्यात जाला आहे इतके तरी करावे की सभाजीचे लेकरबाळ असल्यास शोध्य करून त्यास आणोन आपले जवळ ठेवावे आपला लवकीक होईल बेगमसाहेब म्हणाले की माझे मनांत आहे परंतु त्यास कोन आणितो आनिल्यास मी त्याचे लेकराप्रमाने चालवीन तो माझा लेक असील म्हणाले हे तरी खंचित नाही तर सभाजीची गत जाली तयेसी याची न व्हावी याचे वचेन द्यावे म्हणजे माझे घरी साहाच्यार महिने दक्षेनी ब्राह्मण येत अस्तो त्याजला तिकडे पाटवितो शोध करलि असल्यास घेऊन येईल (*म. फा.) त्याची खांतरजमा करावी आणि वचेन (२२) द्यावे तेव्हा बेगमसोा बोलली की माझे वचंन शेपतपूरवक आहे त्या ब्राह्मणास मजकडे घेऊन येणे मी त्याची खातरजमा करील वचेन देईन नंतर आसीलीने बाळांजीपंत यास मजकूर जाला तो सागोन मानिलेस बेगमंसाहेब याजकडे घेऊन गेले याणी हजार रुो नजर केली बेगमसाहेबाणी सागितले की तुम्ही खांतरजमेन शोध करून त्याचे मुलांस घेऊन येणे त्याचा बंदोबस्त करून देईन याप्रो वचन प्रमान देऊन बाळाजीपंत निरोप घेऊन देसी आले प्रतिनिध्धी व पिंगले (म. फा.) (२३) मार सांगितला की राजा तरी मारला गेला मी जाऊन बेगमसाहेबाची भेट घेऊन वचन घेऊन आलो आहो मर्जी असलियास मुलास हवाले करावे दयेवी असलियांस अवघेच घडले नाहीतरी येथेही कोन्ही राहू देनार नाही आम्हास काये जेसे सांगाल तैसे करू तेव्हा राजा व प्रतिनिधी व अष्टप्रधान मिळोन येक सल्हा ठहराऊन राजा शाहूस बाळाजीपताचे हवाले केले राजा तीन साडेतीन वर्शाचा होता बाळाजीपंत येक पालखी मुलास बसावयास दहावीस (म. फा.) दहापाच घोडे इतके लवाजमियानंसी मुलास घेऊन दिलीस आले शाहूची व असीलाची (२४) भेट करून नंतर बेगमसाहेबाची भेट घेतली दैव शाहूचे आधिक बेग(म) साहेबाने पाहताच आपले मांडीवर बसऊन आपले वाड्यात जांगा वेगली मुलास करविली मुदबारख्याने स्वयेपाक करून जेऊ घालावे आणि आज्ञेप्रो निजावे बसावे बेगमसाहेब याजपासी याजप्रो काही येक दिवस गुजरले हे वर्तमान बादशांहास समजले की बेगमने सभाजीचे मुलास आणोन आपले जवळ ठेविले आहे तेव्हा बुध्या ते बेगमसाहेब याज याजकडे बादंशा येऊन त्यास

विच्यारिले की तू आपला कोनता लेक आणिला तो (म. फा.) (२५) विला नाहीं तिने आणोन पायावर घातला त्याने आपले मांडीवर बसंविले बाळाजीपंत बाहिर उभेच होते कैसा हा आणिला हे वर्तमान बेगमास विच्यारिले त्याणी सागितले की अवघी खटपट या मुलाची बाळाजीपंत याणी केली तेव्हा बाळाजी-पंत यास बादशाहाणी पाहून शाबासकी दिल्ही हुकूम चोपदारास जाला की बालाजीपंत या मुलास दरबारात घेऊन येत जातील तेव्हा येऊ देणे दिक्कत न करने बाळाजीपंतास सागितले की तुम्ही आमचे पोत्र्यास रोज कचेरीत आर्णात (म. फा.) (या) प्रमाणें हुकम जाला बांदशाह आपले मकाना (२६) वर गेले नंतर रोजबरोज शाहूस जेऊ घालून बाळाजीपंत यानी कचेरीत नेत असावे शाहू लाहांणच होता कचेरीत आला म्हणजे बादंशा तक्तावर बसले म्हणजे आपणही तक्तावर बसावे याप्रमाणे होत होतें नंतर बाळाजीपंत याचे कागजपत्रं प्रतिनिधीस पिगळे पेशवे यास उजागरीणे येऊ जाऊ लागले बादंशाहाणे मुलास जेडजेव्हार बहुतेक देत गेले यास पाच साह वर्श गुजरले तो अेके दिवशी दरबार आलंम भरला आहे मानसिंगराजे जाधवराव देउळगांवकर याहास बादशाहा म्हणाले की तुम्ही आपली लेक यास देणे जाधवराव बोलले की मी यास देणार नाही (२७) की तुमचे जातीच नाही म्हणून यास लेक देत नाहींत की काय मानसिंगराजे बोलले की माझे जातीचा आहे परंतु मी औरंगा-बाद सुभ्याचा सत्तावीस चावडयाचा देशमुख देशपाडे पन हा बेवतन म्हणोन देणार नाहीं बादशाहा म्हणाले की आम्ही यास वतनदारी करितो तुम्ही आपली लेक देणें त्याजवरून मानसिंगराजे याणी आपली लेक शाहु राज्यास अंबिकांबाई दिल्ही बादशहाणी लग्नं केले बारा लाख सवार पांच लाख पैंदळ इतकी यासी सिदा पंधरा रोज पावेतो होतो मोठास (म. फा.) जाला त्यास कित्येक पैसा लाग (२८) ला असेल ते बादशाहा जाणेत आपले मनात संकेत केला कीं आपला नातू तेव्हा यास सर्वपरी अधिक अधिकार द्यावा तेव्हा योजना सहा सुभे दक्षणेची सरदेशमुखी दहा रुा सेकडा प्रो वतनदाराचा वतनदार फौजबदाचा फौजदार हे योजना करुन सनंद छ १ राावल सन १०८८ फसलीन करून दिल्ही बाळाजी विस्वेनाथ याणी सनदा इकडे पाठविल्याकी अमल ज्यारी करने तेव्हा प्रतिनिधी व पेशवे वगैरे दिवाभीत झाले होते त्याच्याने कोणती गोष्ट जाली नाही सनंदा मांत्र जवळ (म. फा.) (२९) बसले राजे शाहु व बाळाजी विस्वेनाथ सनंद आलियावर दिल्लीसच साहांच्यार महिने होते तेव्हा बादशाहाणी बांळाजीपंत याहांस विच्यारिले की तुम्हास सनंदा सरदेशमुखीच्या करून दिल्ह्यां

त्याचे कैसे जाले अमले ज्यारी जाला किंवा नाही त्याजवरुनं याणी अर्ज केला की अद्याप अमल ज्यारी नाही त्यास तुम्ही शाहु राज्यास तिकडे घेऊन जावे अमल करावा त्याजवरून बादशाहाणी व बेगमसाहेबाणी जेडजे (म. फा.) व माहीमरातंब बादवलती (३०) चे तमाम तितके दिल्हे पागे पैा हाजार घोडे व दाहा हाती सरकारातून दिल्हे त्या सधीत मा।दखा सुभेदार दक्षेनेचे होते त्याजकडून काम काहाडून सेख हुसेनखा यास सुभेदारीची खिलत जाली बादशाहाणी हुसेनखानास सागितले की यास अमल सरदेशमुखीचा तुम्ही बसून द्यावा आणि यासी याचे मायेपासी पोहोचाऊन द्यावे राजे शाहु याची व सेंदाची पयेवरवी बराबर हजरतानी बाळाजीपंत यास सागितले की तुम्ही हुसेनखाचे समागमे जावे बदोबस्त कर (म. फा) (३१) पासी तुम्ही वकिलीस येणे जे कमती पडेले यासी पुरवणी करून देऊ नंतर राज्याणी बादशाहाचे पायावर डोकी ठेविली त्याणी मस्तकी हात ठेविला बादशाहा व बेगमसो वगैरे याणी निरोप राज्यास देते वेळेस हायेरान जाले की सात आठ वर्षे मूल आपणाजवळ होता आता दूर चालला हा ममतेचा विच्यारही होऊन निरोप अवध्याचे घेऊन बाळाजपिंत राज्यास घेऊन संदा बो देसी आले मातोश्री (म. फा) म राजा वगैरे याच्या भेटी घेऊन (म. फा...) नंतर याणी सिवाजी राज्ये (३२) याचे वेळेस मुलूक बिज्यापूर सुभ्यापैकी दाबला होता तो पुन्हां माघारा घेतलो आणि अवरगाबादे सुभ्यात अमल बसविला हे वर्तमान सागावयास पुन्हा दिल्हीस बाळाजी विस्वेनाथ जाऊन आले नंतर अवरंगाबादेस कामकाज लागले तेंव्हा सैदाकडे बाळाजी विस्वेनाथ याणी जावे; याप्राो चालत होते सन १०९२ अवरंगजेबं बादशाहा आखर गादींवर मा।दशा बादशाहा बसले सन १०९३ प्रतिनिधी मेले नंतर श्रीपतराव प्रतिनिधी व बाळाजी विस्वेनाथ मिळोन दवलतीचा कारभार करीत होते फोज घेऊन प्रतिनिधी जाऊ लागले कर्नाटक व तेलंगण वगैरे खंड (म. फा) (३३) त असावी सरदेशमुखींचा अमल महालोमहाल गुमास्ते अवरगाबांद सुभ्यात बसले वरकड सुभ्यांत अमल ज्यारी न व्होता बिज्यापूर सुभ्यापैकीं आसपास दरसाल लाख दोन लाख रुपयांचा मुलुक सोडवावा याप्रमाणे आनविले होते चाळीस पणास हजार जमियेत होती राजेही दिवसानादिवस उमेदीस आले पिगले पेशवे होते याचे म्हातारपणं जाले त्याचे वरंचा कारभार बाळाजी विस्वेनाथ त्याचे गुमास्ते म्हणौन करीतच होते राजे बाळाजीपंत यास अेके दिवशीं म्हणाले कीं पे(शवे- गिरी)ची वस्त्रे तुम्हास देतो त्याणी उतर केले की (म. फा) आहेत तो पावेतो

असेच चालो द्यावे (३४) मला वस्त्र घ्यावयाचे नाहीत ते अस्ता वस्त्रे घेतली तर लवकीकात चांगले नांही बंद मामली होती ते दिवसी इतकाच मजकूर जाला मन ११०२ फसली पिंगळे पेशवे याचा काळ जाला त्याणी तेच दिवंशी पेशवेगिरीची वस्त्रे बाळाजी विस्वेनाथ यासी देली त्याणे आपले नावाची मोहोर काही केली नाही कागजापत्रावर करने पडले तरी येजमानाचे नावाची मोहोर करीत होते बाळाजी विस्वेनाथ पेशवे याचे चिरजीव बाजीरावही उमेदीस आले रोज दरबारास येऊ जाऊ लागले काही एक दिवस अैसेच गुजरले श्रीपतराव यास राजे शांहु याणी सागितले की तुम्हीं स्वारीस जात अस्ता त्यास येखांदे निकडीचे काम (म. फा) तुम्ही जात जावे नाहींतर बाजी (म. फा) (३५) तीस सरजाम फौज देऊन पाठवीत जाणे याप्रो हुकुमं जालां सन ११०३ फसलीस बाळाजी विस्वेनाथ दिलीस गेले होते तेथे जेणार्धनपंत भाणूस वकीलीचे कामावर ठेऊन आले दिवसान दिवस मान अधिक वाढीत चालिला याजकरिता अवरगाबादेस सयेदाकडील साहाच्यार मेहेन्याणी जेवाबसालास येते होते ते राहून आनंदराव सुमंत याजकडे वकीली सागितली याप्रमाणे क्रम चालला असता राजे याणी आपले प्रधानास ज्याहागिरी नेमून करुन दिल्ह्या त्रितपसील सरजाम व जात ज्याहगीर (म. फा.) (३६)

९०००००*	श्रीपतराव प्रतिनिधी जात्त ज्याहगीर दोन लाख व सरजाम दोन हाजार यास जाहगीर सात लांख
७०००००	बालाजी विस्वेनाथ पेशवे जात जाहांगीर दोन लाख सरजाम पधरासे यासी जाहांगीर पाच लांख
५०००००	आनंदराव दाभाडे सेनापती जात दोने लाख व सरजाम हाजार यास तीन लांख
३०००००	यादोराव लक्ष्मन सचिं(व)त जात जाहांगीर दोंड लाख व सरजाम पाचसे यास जाहागीर दीड लांख
१०००००	आनंदराव सुमंत जात जाहांगीर लाख सरजाम नाहीं
१०००००	अमात्य यास जात जाहांगीर
५०००००	पंडितराव यास जात जागीर पांच (म. फा.) (३७)
४००००	मंत्री यास जाहंगीर
६००००	न्यायाधीश ज्याहगीर
३२००००*	

* मुळांत बेरीज चुकली आहे.

बाळाजी विस्वेनाथ पेशवे याचे जाहागिरीचा दाखला आजपावेतो आहे बाळाजी विस्वेनाथ याचे घरी राजे आले तेव्हा पुरधर कारभार करीत होते ते सात लाख रुपयाची ज्याहागीर खात होते तेथून सखाराम भगवगत कारभार करु लागले त्याजकडे तीच जाहगीर सात लाख रुपयाची होती अलिकडे नाना फडण(वीस कार)भार करु लागले तीच जाहांगीर होती सन ११०७ फसलीचे साली सयेंदा-कडून सुमेदारी दक्षेणची काहडून आसंबज्याहाकडे सांगितली याणी देसी येऊन अमल करु लागले मुलकाची उज्याडी भारी जाली कर्नाटक व हायेद्राबाद सुभा यथे अमल कचा बसेना जामेदाराचे प्राबले भारी उचल पैसा देत होते तेव्हा याचे पारपत्य करून अमल बसावयास काही आनखी जमियेत लागले आपले बरोबर दोन लाख जमियेत आहे याणे होणार नाही व राजे शाहु हेही स्वारी करुन खंडन्या घेतात तेही जबरदस्त होते ते व आपण येक होऊन तेव्हां (म. फा.) (३९) वही लागणार नाही बदोबस्त होऊन अमल बसेल तेव्हा आनंद्राव सुमत यास सांगितले की तुमचे कारभारी बाळाजी विस्वेनाथ आहेत त्यांस पत्र लेहून आनवावे काही मजकूर करावयाचे आहे तेव्हा त्याणी राजे शाहूस अर्जी लेहून बाळाजी विस्वेनाथ अवरंगाबाद्देस आनिले तेथे आसंबज्याहाची त्याहची भेट जाली नंतर त्याणी मार याहासी केला की तुमची जमियेत पनास हाजारने (म. फा.) आमचे जवळ असावी आणि तुम्ही खंडणी (म. फा.) घेता हेही घेऊ नये आ (४०) मल तुम्ही आम्ही मिळून मुलकात बसू याणी उत्तर केले की पणास हजार जमियेतीणे नेहेमी तुम्हाजवळ द्यावी त्याची खर्च कोण देतो तुमच्याने देवनार नाही नाहक खटका पडेल आम्हास मुलकाची आशा काये असे बहुत प्रकारे बोलणी होऊन इत्यार्थ (म. फा.) (तु) म्ही दिलीस चला तुम्हास सहा सुभे दक्षनची चौथाईची सनंद करोन देवितो आणि तुम्ही व आम्ही मिळोन आमल करू सरदेशमुखी व चवथाई दोन्ही अमल करू दर माहाळास तुमची बसून देऊ याणी उत्तर केले की मजला तुमचे ब (रोबर) येता येत नाहीं तुम्हीं अगोधर दिलीस जा (ऊन) (व) (४१) बाद्शाहाचे मनात मजकूर भरऊन राज्याचे कडे पत्र पाठवावे म्हणजे मी येईन तो पांवेतो मी ही आपले येजमानासी बोलून नेम ठहरवितो या प्रा। बोलने होऊन निरोप घेऊन बाळाजी विस्वेनाथ पेशवे राजे शाहू याजपासी आले आसबज्याहा याज कडील मजकूर समजाविला * राजे याणी सागितले की बरे आहे पत्र आल्यावर तुम्ही

---

*मुळात शब्द लिहून खोडला आहे.

जावे आसबज्याहा कूच करून दिलीस गेले बाद्शाहची भेट घेऊन दक्षेनेती मजकूर समजाविला की जो मुलुक तेथ लावणी जुजबी (म. फा.) लावणी तो मुलुक जमेद्राराचे साधी न (उचक) (४२) पैसा देतात त्यात राजे शाहु याचा हिसका ते ही सरदेशमुखी बंद्ल खंडनी घेतातात त्यास चोर भांडारी करावा त्यास सामील करावे म्हणोन जमीन दाराचे जमीनदारावर माडून अमल बसेल आणिक लावणीही होईल तर त्याचा लेख करून घ्यावा पनास हाजार फौजनसी सुभ्याची तयेनाती करून सहा सुभे दक्षेनची चवथाई खात जावी या प्रो अर्ज केला तो मादशा बाद्शाहा याचे ध्यानास येऊन राजे शाहू याचे नावे पत्र पाठविले की तुम्ही येणें अथवा बाळाजी विस्वेनाथ याजला पाठवणे ते पत्र आल्यावर बाळाजी विस्वेनाथ पेश (वे) (४३) याची रवानगी दिलीस जाली तेथे जाऊन बाद्शाहाणी आज्ञा केला की तुम्हास दक्षेनंची चवथाई देतो तुम्ही सुभ्याची तैनाती करावी त्याजवरून याचे त्याचे बोलने होऊन याणी तैनाती करू म्हणौन बाद्-शाहाचे लेख करून दिला आणि चवथाईची सनद राजे शाहू याचे नावे छ १५ जमादिलावल सन १११३ फसली तेही मिळोन देसी आले आल्यावर आसब ज्याहा याचे तेनातीस बाजीरावबलाळ साठ (स) तर हजार फौज अैसे दिल्हे वराड सुभ्यात जमी (म. फा.) या मुफसद मोडून अमल बसविला (४४) त्यास दोन तीन वर्ष जाली काही हयेद्राबाद सुभ्यातही बसवीत चालले आनंद्राव सुमत आसब ज्याहासी मजकूर करीत गेले की तुमचा अमल बसला अस्ता आमचा अमल ज्यारी करावा तो म्हणाला कीं करून देऊं अैसे काही टाळाटाळीचे बोलने बोलत गेले तव्हा अेके द्विवसी बाजीराव याणी विच्यारिले की आम्ही आज पाच वर्शे रूबरू आपले तैनातीस आहो परंतु आपला अमल बसून देत आहे परंतु आमचा अैवज मनस्वी खर्च जाला अद्याप अमल देत नाहीत आनंद्राव सुमत (म. फा.) (४५) अमला विशई बोलत आहेत त्यासी उत्तर आर्सीवादाचीच होत आहेत त्यास आता अमल देवाव येवळ चा गुन येका येकीच त्यास उतर केले की चवथाईची तरीक्याच सनंद करून देविली त्यापेक्षी तुम्ही अमल कशाचा मांगता अेक सरदेशमुखी आहे ते सोईने देईन हे उतर होताच बाजीराव जेवा-नच होते ते याचे जेबाब दर जवाब निकुराचे देऊन आपले मकानास आले अेके दिवस (म. फा.) (कसम) खाऊन दुसरे द्विसीं खजीना आसब ज्याहाचा (म. फा.) लुटला अेक लढाईची पुरावत जाली रोज लढाई

(४६) होऊं लागली. पुढे बाजीराव मागे आसबज्या हां तमाम बेद्र हयेद्राबाद् वगैरे च्यार पाच प्रदक्षेना जाल्या रोज आगांडी पिछयाडी मारावी बाजीराव याणी राज्यास लिहिले अवरंगाबाद सुभ्या पो माहाल दाबीत चालले हा गिला आसबज्याहाणी दिलीस लिहिला तेथून राजे शाहू व बाळाजी विस्वेनाथ याहा (स) बोलवणे जाले हे कांही गेले नाहीत कोन्ही म्हणतात की राजे शाहू व बाळाजी विश्वेनाथ पेशवे गेले होते तेथे जाऊन मादशाबादशाहा राजास आले जामीन देऊन पळून आले परंतु आपले अैकिन्यात नाही लो (क) (म. फा.) (४७) बोलन्यावरून लिहिले असे आमचे येकिन्यात की हे गेलेच नाहीत जाणून याचा वकील जेनार्धनपंत भाणू होता त्यास तसंदी देऊन मारले आसब ज्याहाणी गिला लिहितच गेले हे लढोन मुलुक दाबीतच गेले खानदेश सुभ्याचे बंदोबस्तास सेनपती बरोबर सिंदे होळकर गाईकवाड व भोसले देऊन पाठविलें होते याणी खानदेश सुभ्याचे माहाल सर करून हिंदुस्तान गेले सवाई जयसिंगासी लडाई जाली रसदं बद करून या मडलीस कोंड (४७) ले होते फौज फार खराब जाली सवाई जयसिंगाने केली शाहुराजे याजकडील सरजाम जर्जेर जाला हे वर्तमान बाजीराव बलाळ याणी येकून आसब ज्याहासी बेजार केले तेव्हा त्याचा याचा तह सन ११२१ फसलीत जाला बितपसील

१ वराड सुभ्यात हिसा चवथाई व सरदेशमुखी परभारे महालो महाल घ्यावी कलम

१ हिसा मुलुक मि जुमले

५८८९१३१।· ॥·	खानदेश सुभा दरोबस्त
८२१५३५५	खुदस्त बुनियाद पो महाल
३०६७६०००	हैद्राबाद सुभ्या पो. (४९)
४४७८०४८६।· ॥	पो वजा सरदेशमुखी दरसेकडा १० रू प्रमाणे ४४७८०४८६॥—।

बाकी ४०३०२४३७॥।

पो वजा आम्ही दक्षनचे सुभे गोलकुडे सरकारचा हिसा तुम्ही न मागावा सबब रकम सरकार गोलकुडे १७९५४३७॥। बाकी रकम ३८५०७००० याचा हिसा चवथाई ९६२६७५० (म. फा.) की जाहागीर २८८८०२५०

(५०) स्वराज्यांचा अमलाचा अैवज येकदर ४४७८०४८॥-॥ सरदेशमुखी ९६२६७५० चवथाई १४१०४७९८॥-॥ यासी यैवज लाऊन दिल्हा ५८८९१३॥-॥ खानदेशसुभा दरोबस्त ८२१५३५५ सुभे खुजस्ते बुन्याद पो माहाल

१४१०४७९८॥-॥

१ बाकी अवंरगाबाद सुभ्याचे माहाल राहिले त्यात हिसा परभारा घ्यावा (५१)

१ बिज्यापूर सुभ्याची मुलतवी (मी) जेवाबाब सेवाल तो मुलुक जोर तलबी या निमित्य निमे निमे वाटून घ्यावे १ हैदराबाद सुभ्या पो अमल बसवावयास अरकाटकडे अनवरदीनखा गेले त्याचे समागमे बाजीराव याची फौज होती व शास्तेखान पानगलाकडे गेले त्याचेही बरोबर फौज होती दोघाणी दोन करोडचा मुलुक साधिला त्यांत याचा हिसा पासष्ट लक्षाचा लाख रूपये होता ते रुजुवाद खेड (५२) म्हणोन वाटणी राहिली रुजुवात जाली अस्ती तेव्हाच वाटणी होती मुलुक घेतला अस्ता ते भाडनं अद्याप आहे बाजीराव यास हिंदुस्थानात सेनापतीस अटकाविले सबब जाणे जरूर जाणोन सेरालि बर घेतली की रूजूवात जाली म्हणजे पासष्ठ लाख रुपयेचा मुलुख देऊ याणीं जाण्यामुळें तह केला कलम १ याणी त्यास रक्षावे त्याणी याहास रक्षावे अैसी सतावीस कलमाची याद आहे.

सलूक करून बाजीराव हिंदुस्थानात गेले त्या (?)

(५३) च्या दिवसान दिवस मातंबरी अधिक वाढत चालली सबब गुमास्ते अष्टप्रधाणाची आपलाले कामावर ठेविले त्याणी कागजावर चिन्हे करावी

१ मुजुमदार गुमास्ते पेशव्याचे

१ अमात्य याचे

१ भाणू मारला गेला सबब त्यास फडणीशी

१ चिटणिवीस पुरंदर

१ आणिक प्रधान याणी आपले आपले कामावर ठेविले

बाजीराव हिंदुस्तानास जाऊन जयसिग राजे यासी लढाई घेऊन सेनापती वगैरे यास खंड (५४) णी घेऊन सलूक करून पुढे गेले तमाम राजे रजवाडे याजपासून घेत काशीपावेतो गेले हिंदुस्थानात दोन कोटीचा मुलुक घेतला सिद्दे

होळकर यास वाटून दिल्हा गाईकवाड यास गुजरातात पाठवविले सन ११२४ फसली अवलसाली मादशा आखर जाले गादीवर सानी आलमगीर बसाविले याहाचा वकील पाच्यार वर्षे दिलीस नव्होता भाणू मारला तेव्हापासून तिकडे कोणी न गेले हे तिकडे गेल्यावर यादोरावास दिलीचे वकीलीवर ठेऊन सन ११२४ चे आखेरीस सातारियास आले शाहू राजाच्या भेटी जाल्या (५६) १ सन ११२५ आसबज्याहापासून पासष्टी लक्षाचा मुलुक लढाई करोन माहोरचे आसपास घेतला १ सन ११२६ फसली

१ दिलीहून आसफ जाहावर सुभा फतेखां आला आसबज्याहा याणी बाजीराव यास बोलाऊन याणी त्याणी मिळोन पांडूर परभणीचे सुमारे बुडविला फतेखा आखर जाले.

१ बाळाजी विस्वेनाथ पेशवे यास देव आज्ञा जाली पेशवेगिरीचे वस्त्रे बाजीराव बलाल यांस जाली (५७)

१ बाजीराव याणी कोकणपटीचा अमल बसून कर्नाटकात गेले.

१ सन ११२७ फसली कर्नाटकात बाजीराव गेले होते सटवाजी घोरफोडे याचा मुलूक पधरा लक्षाचा घेतला सोडणूर वगैरें पचेवीस हजार रूपयाची जाहगीर खायास ठेऊन स्वारी देसी आली

१ सन ११२८ फसली बाजीराव पेशवे कर्नाटकात जाऊन सुतपूर वगैरे कर बेरडाचा दहा लक्ष्याचा मुलुक घेतला

१ सन ११३० फसली गुजरातीत बाजीराव पेशवे (५८) गेले तिकडून जाऊन गाईकवाड याणी काही मुलुक साधिला होता व याणीही जाऊन आणिक मुलुक साधून त्याची स्थापना केली दोन करोडीचा मुलुक त्याचे सरजामास दिला काही आपले खालशात अंमदाबाद वगैरे ठेऊन सन ११३१ अखेरीस स्वारी देसी आली

१ सन ११३२ बाजीराव साहेबांची सवारी गोडवनात गेली व रघोबा व हे मिलोन मुलुक करोडीचा साधिला भोसले याची स्थापना नागपुरी करून देसी आले (५९)

१ सन ११३३ सानीन आलमगीर आखर जाले, गादीवर शाहआलम बादशा बसले

१ सन ११३४ करनाटकात स्वारी जाऊन तमाम स्वस्थानच्या खंडन्या घेऊन आखेरीस देसी आले.

१ सन ११३५ हिंदुस्थानात स्वारी केली तमाम खंडन्या घेतल्या कांही बुंधेलखंडचे आसपास मुलुक घेऊन सन ११३७ फसली देसी आले.

१ सन ११३८ फसली गढे मडळाकडे गेले ते तेथील राजे यासी लडाई होऊन त्यानी फौज फार बुडविली दाहा हजार फौजनसी माघारा आले आपेश बाजीराव यासी कधींच आले नाही हे आले (६०)

१ सन ११४० करनाटकात जाऊन दाहा लक्षाचा मुलुक घेऊन अखेरी देसी आले.

१ सन ११४२ गढे मडळाकडे जावे आणि त्या राज्याचे परपत्य करावे हे मनात होतेच या निमित्य स्वारी हिंदुस्थानात दिलीचे आसपास जाऊन खडण्या घेतल्या येथून मथुरे पावेतो गेले तेथून स्वारी माघारे फिरली दिलीचे वकीलीवर हिंगणे नाशीकर उपाध्या पाठविले गंढ मडळाकडे यावे तो सरीरास स्वस्थ नाहीसे वाटले देसी यावे (६१)

सन ११४५ वाटेने देव आज्ञा जाली राजे शाहू बहुत श्रमी जाले बाळाजी बाजीराव यास पेशवेगिरीचे वस्त्रे झाली आसबज्याहाणे पासष्ट लक्ष रूपयाचा मुलुक दाबला

१ सन ११४८ चिमाजी आपा होते याणी जमियेत करून नाना साहेब लहाण होते यास बराबर नेऊन आसबज्याहासी लढाई घेऊन पासष्ट लक्षा (चा) (म. फा.) मुलुक तलगनात इदूर वगैरेचे आसपास (म. फा.) आनदराव सुमत याची मातबरी जालीस (म. फा.) आसबज्याहा कडील वकीली परसी गम महादे (म. फा.) सागितली

१ सन ११४९ चिमापा आखर जाले. (६२)

१ सन ११५० नानासाहेब व भाऊसाहेब लहाण वये असून करनाटकात जाऊन खडन्यां घेऊन सन ११५१ फसलीत माघारा आले

१ सन ११५२ फसलीवर आसबज्याहा आखर जाले

१ सन ११५३ फसली श्रीपंतराव प्रतिनिधी आखर जाले

१ सन ११५९ नासरजेग फुलचींकडे गेले राजे शाहू आखर जाले मरते-वेळेस भोसले व गाईकवाड सेनापती वगैरे सरदार जमले राज्याणी आपले मनात

सकेत केला की आपणा (म. फा.) स वंशे नाही मुलीपासून बाळाजी विस्वेनाथ याणी खटपट केली तेव्हा हे (६३) हे राज्य प्राप्त जाले त्याचा नातू बाळाजी आहे याचे हवाले हे राज्य करावे दुसरे आपणास राज्ये ब्राम्हनास देणे त्या पेक्षी यासच द्यावे यैसा मनसोबा करून नाना सो यांचे हवाली सिका मोहोर बादशाही संदा वगैरे तमाम जो होता तो याचे हवाली केला आणि सागितले की मर्जीस आल्यास आमचे वंशांचे नाव चालवावे नाहीतर कारण नाही कलम

१ रामराजे नाना सोनी दंत गांदीवर बसविले

१ सन ११५९ फसली

१ रामराजा व भाऊ सोसीं गोळ्यास येऊन (६४) येमाजीपंत अन्ना यास धरले किले मानईवर ठेविले

१ नाना साहेब पुण्यात अस्ता सेनापती केले चिखलीवर आले तेव्हा भाऊ सो यास बोलावून आणोन फौजं सुध्धा याची व त्याची लढाई होऊन होऊन सेनापंतीस लुटलें तेव्हापासून श्रावण मासचे दक्षेंना दाभाडे पूर्वी हाजार पाचसे ब्राह्मणास दक्षेना देत होते त्यास धरले तेव्हा त्याणी सांगितले की आमचा श्रावन मास येव्हडा आपण चालवावा त्याजवरून आरभ केला

१ श्रीमंताची सवारी अवरगाबादेस आली तेथे सत्रा लाख रु॥ खंडनी घेतली तेथून हैद (६५) राबादेस आले तेथे सतरा लाख रुपये खंडनी घेतली कलम

१ ताराबाईने फितूर करून रामराज्यास कैद केले

१ देमाजी गाईकवांड गुजराताहून फौज सुध्धा साताऱ्यास येत होतो त्याजवर बापूजी बाजीराव फौज देऊन पाठविले त्याची याची लढाई होते होत सातारीयास आले

१ नाना साहेबाची सवारी हयेदराबादेहून सातारी यास आले तेथे देमाजी गायकवांड याची लढाई होऊन गाईकवाड यास धरले कलम

१ नासेरजेंग फुलचुकडे लढाईत आखर जाले व हिलाल (६६) मोहो-दीनखाही मेले बसालतजेंग व सलाबेत जेंग व निज्याम अलीखा मोगेल अली यास घेऊन रामदासपंत हैदराबादेस आले कलम

१ नानासाहेब याणी सातारी यास नाना पुरंदर कारभारी ठेऊन पुन्यास आले कलम

१ सन ११६१ फसली

१ रामदासपंत याणी बिगांड करून अवरंगाबांदेहून फौजसुधा पुन्याकडे चालून आले तिकडून श्रीमंत थोडके फौजनसी घोडनदी पावेतो आले तेथे ग्रहंणाचे दिवसी मुजफरजंग याणे छयापा घातला फिरून श्रीमताणी साभाळोन फौजची जमियेत मांडली लढत लढत कोरगांवास आले तेथे लढांई (६७) होऊन चेडूली बुडविला तेथून महागाई जाली सबब नवाब माघारे फिरले ते भालकीवर आले तेथे लढाई होऊन सलूक जाला ते वेळेस त्रिंबकचा किला घेतला नवाब हैद्राबादेस गेले कलम

१ रामदासपंत मारले गेले कलम

१ सन ११६२ फसली

१ नानासाहेब कृष्णातीर पावेतो गेले तेथून महादेव बाबास बिदुणुरावर रवाना केले खास सरकारी त्रिंबकेश्वेरास आली कलम

१ सन ११६३ फसली श्रीमंताची संवारी सावणूरावर गेली सलाबतजेग यासी परसराम महादेव वकील घेऊन आले सावणूरवाले पठान आबदुल मजूदखा व मुऱ्हारराव घोडफाडे व मुफेते: जेगं अैसे सिवणूराहून (६८) लढले सावणूर फते करून अका लक्ष्यांचा मुलुक घेतला कलॅम

१ नवाबांचा वाटन्या जाल्यां

१ दवंलतीचे खाविंद सलाबतजेंग

१ अद्वनी रायेचूर बसालेतजेग

१ वराड सुभा निज्याम अलीखा बहादुर

१ मुगलअलीखा बिजापूर कलम

सन ११६४ फसली

१ परसराम महादेव यास कैद करून घर लुटले त्याचे हाताखाली धोंडोराम होते यास मुख्ये वकीली सागितली कलमी

१ श्रीमंताची सवारी श्रीरंगपटनाकडे गेली तमा (६९) म सर्वस्थानाच्या खंडन्या घेऊन आखर साली पुण्यास आले कलम

१ सन ११६५ फसली हैदरजंग याणी बिगांड केला हैदराबादेहून चालून आले श्रीमंतही पुण्यांहून आले तादुळज्यावर लढाई जाली सलूक धोंडोराम याचे हाताने नेम जाला बाबूजी नाईक याजकडून वकीलीचे कामांवर कृष्णराव बलाळ होते त्याचे हाताने सलूक जाला सबब त्यास वकीलीचे वस्त्रे दिल्हीं

धोंडोराम त्यास हस्तगत करून जाले सलूक करून श्रीमंत इदुस्थानात चालले चिवटया पासून नानासाहेब देसी आले भाऊसाहेब विस्वासराव इदुस्थानात (७०) गेले कलम सन १२६६ फसली

१ विस्वासराव व भाऊसाहेब दिलीस जाऊन तख्त फोडून काही खजीना घेऊन पानपताकडेस गेले.

१ शाहआलम बादशाह याचा कारभार दिलीत नजीमखांन करू लागले कलम.

हायेद्र नाईक यास तुम्ही राज्यानी शाहना म्हणोन कामा कारभारात घातले होते नाही तर तो मुलुकचा नाईक वाडी होता दैवाने वाढला त्यास राज्याणी फौजचे काम सागितिले होते साल मजकूरी मार निलेनी काये (७१) केले किला हायेद्र नायकाकडे सागितला होता तेथे तयारी अवघीच केली होती अेके दिवशी राज्यास विनंती केली की किला पाहवयास चलावे त्याजवरून राज्याणी चवकशी करून जावे ते गाफलीने गेले हायेद्र नायकाणी राजे दिवान कयेद् केले आपण नमूद होऊन कर्णाटकात जमीदार मुफसद होते तो कोडावयास आरंभ केला हायेद्र नाईक साल मजकुरी प्रसिद्ध जाले कलम

१ कवीजगाकडे किला नगरचा मोगलाई कडून होता भवताला मुलुक आवघा पेशवे याणी घेतलाच होता हाली सलाह करून किला हस्तगत केला त्यास जात जागीर हिंवली वगैरे विसा हजाराची दिली (७२) किल्याचे काम नारोबा बाजीकडे सांगितले कलम

सन ११६७ फसली विस्वासराव भाऊसाहेब पानिपतावर गेले तिकडून गिलचे चालोन आले यांची व त्याची लढाई सुरू झाली भाऊसाहेब याणी लष्करा भोवता खंद् (क) खांदिला तेव्हा मल्हारजी होळकर म्हणाले की ही चाल आपली नाही आपण गणीमभाई दहा वेळा पळावे आणि आणखी लढाई करावी खंदक करू नये अैसे किति अेक काम काजा वरून त्याचे व याचे वाकडे आले होते पाच सहा महिणे लढाई कठिण जाली गिलच्या जेर जेर जाला होता इत (७३) क्यात मल्हारजी होळकर याणी फितुर केला आपण लढाईचे वेळेस फौजसुद्धा भाऊ साहेब यासी बोला चाली करून दहा कोस वेगळा जाऊन उतरला दक्षेनी फौजा होत्याच आणखीही दहावीस हजार फौज होळकर गेला म्हणौन खबर गेली गिलच्यास होळकर याणी सागोन पाठविले की आता पेशवे याची फौज फुटत चालली आहे मी बिघाड करून बाहिर आलो तुम्ही लढाई

पक्की करावी आणि रसंद ही बंद करावी त्याजवरून गिलच्याणी अधिक महागाई केली होती तशात याणी रसंद बंद केली गोविंद भगवत याजकडील सरदार दाहा हाजार फौजवाला रसंद लस्करात घेऊन (७४) येत होता ही बातणी होळकर याणी गिलच्यास कळविली त्याजवरून गिलच्यानी फौज पाठऊन रसंद लुटली गोविंद भगवंत गारद जाले तेव्हा भाऊसाहेब याची हिमत खचली लस्करा भोवता वेढा गिलच्याणी घातला लस्करचे माणूस बाहिर निघेनासे जाले त्याज- वरून अेके दिवसी गिलच्याणे हाला केली तशात विस्वासराव ते याणी परतविली तिसरी हालाहाला केली तशात विस्वासराव यास गोली लागली आखर जाले हे वर्तमान भाऊसाहेब यास समजले तेव्हां आंबारीचा हाती खाले बसवून घोड्यावर बसले ज्यापाजी व (७५) दत्तबावा ज्योतीबावा जनकोजी सिंदे मंडळ व आनखी दहा पाच मानकरी असे घोड्यावर बसले आगांडीस लढाईचे तोंडावर येत होते इतकियांत आघाडीवाल्याचे चित्तास संवशये आला की सरदाराचे दोन्ही हांती बसावयाचे कारण काय हा अदेशा प्राप्त होताच लढाई कमती पडताच गरदी जाली गिलच्याणी घोडेच घातले खंदक बुजून निघाला अैसे लस्कर अडिच लाख सवार पयेदळ गारद जाले काही कार्य कारण राहिले पळोन बाहेर निघाल्या होळकर याणी लुटले अैसी अवस्ता जाली विस्वासराव तरी तेथेच आखर जाले ! भाऊसाहेब व (७६) सिंदे व होळकर व आणखी दहा पाच मानकरी गरदीत जाले ठिकान लागले नाही तुटेफाटे कोन्ही वाचले ते नाना पुरंदर व नाना फडणवीस व पारवतीबाईस समागमे घेऊन देसी आले कलम

१ सन १२६८ फसली

१ नानासाहेब याणी भाऊसाहेब व विस्वासराव याचे वर्तमान आयकून दुखन्या पडले होते चिंतेने दोन महेन्याणी निजधाम आली आस्विनमासी काळ जाला

१ गादीवर माधोराव भाऊसाहेब बसले

१ हेंदरजेग नबाब याचे दिवानाणी पासष्ठ लक्षाचा मुलुक दाबला

१ राघोजी भोसले याची पत्र दादासाहेब यास आली (७७) की गढे मंडळवाले राजे बहुत जबरदस्त जाले आहेत आम्हास माणीत नाहीत आमचे मुलकात खंडणी घेऊन अमल बसविनार हा बेत त्यास एक वेळा इकडे यावे म्हनजे पारपत्ये करितो त्याजवरून याणी फौजची तयारी मांडली कलम

१ निज्याम अलीखा बहादूर याचा इजाहार हायेद्रजगाचे चितात की चवघा भावा पौ हाच काबिल जबरद्स्त आहे याजकडे आळजपूरचा सुभा आहे तेव्हा हिशोब किताबचे फेरात आणून भावा भावासी वाकडे आणौन कैद करावे हा बेत हैंद्रजंगानी या उद्देशे एक वरशभर निज्यामअलीखां (७८) यास आळजपूराहून आणून हिशोबाचे अैवजाचे धोरात घातले होते निरोप देइनात निज्याम अलीखा बेजार जाले आणि दवलतीचा कारभार हायेद्रजगाकडे हमेशा सुभेद्रार आणि याजपासी दोन च्यार मुदसदी येलची होते कोन्ही मुक्तार नव्हते काम जातीवरच कृताकृत विच्यार जे पडल्यास विठल सुंद्र यास विचारावे त्याजवर मात्र लोभ अैसा क्रम होता विठल सुंद्र संगमनेरकर राहणार पूर्वी कवीजगाकडे चाकर होता निज्याम अलीखा याची व कविजगाची भेट ताडुळाज्यावर जाली (७९) तेव्हा कवीजगा बो विठल-सुद्रही येत जात होते बोलण्यात खबरदार पाहिले तेव्हा कवीजंगापासून विठल-सुंद्र यास मागोन घेतले की आम्हापासी कोन्ही हुषार नाहीत विठल सुद्र यास आमचे जवळ ठेउन द्यावे तेव्हापासून याजपासी होते हाली औरगांबादेवर नवाबाची छावणी निजामअलीखास यास निरोप देईना हायेद्रजेंग निरोप देईनात तेव्हा मोठे सकष्टात होते अेके दिवसी निजामअलीखा याणी विठल सुद्र यास विच्यारले की आपणास येथे येऊन येक वरीश जाले हैद्र जगांसी वाकडे याचे सा (८०) गन्यांवर आपला भाऊ निरोप देईना तिकडे मुलुक भोसले याणी खरांब केला याची सल्ह कैसी करावी याणी सागितले की आपलेकडे सरदारी नाही की च्यार लोक सरदार आपले लगांमी असावे पयेका जवळ नाही पयेक्यावर अवधी साधणी होतात दोन्ही नाही तेव्हा हैद्रजगांसी सलूक करावा तो सांगितले ते अैकून निरोप घेऊन जावे निज्यामअलीखा याचे म्हणने की काही हैद्रजगासी सरेन जाणार नाही यापरीस मरण आले तर बरे यैसे निज्याम-अलीखा बहुत श्रमी जाले तेव्हा विठल सुंद्र याणी विनंती केली की आपण श्र (८१) मी होऊ नये आग्रह मात्र असावा तुमचे बधू नबाब वगैरे आहेत याजवळ विशेष अैवज दिसून येत नांहीत येक हौद्रजंग मातर आहेत याचे पारपत्य कयेसे होईल हे सलाह सांगा त्याजवरून विठलसुद्र याणे अर्ज केला जे आपन स्वस्थ असावे याची सलह निंबाळकर व जाधवराव वगैरे करोन सरदार आहेत यासी बोलून सल्हेत त्यास घेतो म्हणजे सहजात विच्यार पाहून या जेवाबावर मर्जी ते समई निज्याम अलीखा याणी खुश जाली विठलसुद्र

यास सांगितले की सरदाराकडोन लांबी रुंदी पहात जावी तेव्हापासून विठल सुंदर (८२) याणी जाऊन निज्याम अलीखा याचा निरोप जाणजी निंबाळकर यास सांगितला त्याजवरुन निंबाळकर याणी सांगितले की तुम्ही मालीकच आहात उमेद धरा म्हणजे सहजात पारपत्य होईल परंतु मजकूर फुटून द्यावा आणि हिमत असू द्यावी येका दो दिवसा बिंडकर निंबाळकर व सळगे पांढरे व छोटे मोटे मुसलमान अवघे माझे सल्हेत आहेत त्याचे अन्न घेऊन अवघे सरदार मी आपले मकानावर बोलावितो तुम्हास सूच (८३) ना पाठवू तेव्हा तुम्ही येणे म्हणजे अवघ्याकडून रुबकार वचेण तुम्हास देवितो येक जाधोराव आम्हासी त्यासी वाकडे आहे. मी त्यास काही म्हणार नाही आणि हैदरजेंग याचे दोस्त त्याजवर कृपा त्याची आहे तुम्ही त्याजकडे जालतर बहुत विच्यारे जाऊन सल्ह घ्यावी ते पत्यावर ठेवणार नाहीत परंतु तुम्ही बहुत विचयारे त्यासी मजकूर विच्यारावा पत्यावर न आले तरी न येवोत परंतु बातनी न फुटावी असे व्हावे येसा बहुत प्रकारे बोध व खांतर (८४) जमा करून वाटेस लाविले त्याजवर याणी येऊन निज्याम-अलीखा यास मार सांगितला की जाणूजी निंबालकर याजकडे गेलो होतो त्याणी बहुता प्रकारे खातरजमा केली अस्ता जाधवराव याजकडेस जाऊन त्याचे अंतर घेतो निज्यामअलीखा याणी सांगितले की ते सरदार भारी आहेत पधरा हजाराची त्याची जमियेत त्याजकडे जाऊन बहुतेक विच्यारे गोष्ट काहांडावी नाहीतर उद्याचे मरण आजच होईल येसे न होये या प्रा बोलून त्यास जाधवराव याजकडे पाठविले याणी प्रथम (८५) त्यास हेंच विच्यारिले कीं नवाब हैदरजंग आमचे नवाब निज्याम अलीखा यास निरोप होत नाही याचे कैसे करावे तुम्हीं मातबर सरदार आहात हैदरजेंगासी बोलून सफाई करुन निरोप देवावा जाधवराव याणी सांगितले की तुम्ही नवाबाचे भाऊ मालकच आहांत हायेदरजेंग कारभारी त्याचे मनांत तुम्हा विंशई कल्पना भारी आहेत तेव्हा आमचे बोलण्यांने व्हावयाचे आहेत आणि आपण म्हणता तेव्हा संधि पाहून बोलू जाल्यास उत्तमच आहे येसे दुमोशाचे बोलने बोलून निरोप दिल्हा जाधवराव याची अंतरंग होयेदरजंगाकडे हे याचे जाणोन ध्यानास आणौन निजामखा यास समजाविले (८६) नंतर जाधवराव याजकडे जान्याची लगटच सोडून दिल्ही जाणोजी निंबाळकर याणी अवघे सरदार आपले घरी बालाऊन भरोभरी देऊन सवार केले नंतर विठल सुंदर यास बोलाऊ पाठविले त्यास आणौन अवध्याची वचणे जाले इत्यर्थ ठहरला की निज्यामअलीखा याणी आपले मकानावर ज्याफतीस नवाब वगैरे अवघे सरदार

हायेद्रजंगा सुध्धा बोलऊन घ्यावे आणि डेऱ्यांतच कैद करावे विठलसुद्र बोलले की तलवार चालेल जाणोजी निंबाळकर वगैरे बोलले की तलवार चालली तरी पाहून घेऊ जाधवराव मात्र त्याजकडे आहे (८७) त चिंता नाही हा निछ्ये ठहराऊन मकानास विठलसुद्र येऊन निज्यामअलीखां यास मंजकूर जाला तो समजाविला तिकडे हौद्रजंग याणी नवाबास गैरवाका समजाविला की छोटे नवाब आपणास कैद करणार आहेत बेअद्बी बोलतात मी तरी ताबेदारच आहो नवाबाणी उत्तर केलें की मी त्यास सांगतो ते काही माझे रूबरु बोलणार नाही ते सागतील ते येकितील तुम्ही कचेरीस बोलऊ पाठवावे मी येतो हौद्रजंगाचे चित्तांत की अपण रुबरु कटकट काहडावी निज्यामअलीखा आदिक आगले बोलू (८८) लागले म्हणजे नवाबास रांग आणौन कैद करावे हा बेत याचा त्याणी तो बेत करविलाच आहे इस्वेर इछेने दोन्ही बेत येकूकडेस राहिले तिसराच उभा राहिला येके दिवसी नवाब बंरामदं जाले नव्होते कचेरी भरली म्हणजे नवाब येणार तो हायेद्रजंग कचेरीत आले होते निज्यामअलीखा व विठल सुद्र हे ही आले कार्याकारण भरत चालला होत हायेद्रजंग व निज्यामअलीखा व विठलसुंद्र हायेद्रजंग व निज्यामअलीखा बोलत बसले बोलता बोलता हिशोब कितोबाचा जिकर निघाला बोलता बोलता वाढ (८९) ली विठलसुंद्र मागे उभेच होते याणी जलदीचे समई हायेद्रजंगाचे पुढे तलवार होती ते उचली गुडघ्याणे नवाब निज्यामअलीखास डवचले निज्यामअलीखांन पेशकब्ज काहाडून हायद्रजंगास हाणिले विठलसुंद्र याणी त्याचेच तलवारीने वार टाकले दोन वाराणे हैद्रजंग पूरा जाला आणिक कचेरीचा डेरा चिरोन निज्यामअलीखां व विठलसुंद्र बाहेर निघाले घोडयावर सवार जाले इकडे गलबाल जाली इतक्यात जाणोजी निंबालकर याची सवारी कचेरीत येत होती याची त्याची गाठ (९०) पडली च्यारपाचशे मणुस बराबर होते त्याचे त्यांचे सेभर दोनसे डेऱ्यापुढे होते काही लुटली काही मारली गेली जाणोर्जीस निज्यामअलीखांने वर्तमान सांगताच आता का चालतात समये हाच आहे इतक्यात लोकासही इशारा करोन हाजार दोन हाजार लोक व निज्जामअलीखां व विठलसुंद्र याणी नवाबाचे भोवता घेरा घालून कैद केले नवाब अवरंगाबादी होते ते डेरे बाहिर काळया चबुऱ्यावर दिल्हे होते हायेद्रजेंगा सुधा हायेद्राबादेस जाणार या बेतात तो येसी गोष्ट जाली तेच दिवसी जाणोजी वगैरे सरदार (९१) मिळोन निज्यामअलीखास मिरवत नेऊन शेहेरात त्याचे वाडयात नेऊन बसविले द्वाही नवाब निज्यामअलीखानाची फिरली तेच दिवसी

माही मरातबे जाणोजी निंबाळकर यास दिले पूर्वी नव्हते विठलसुंदर यास दिवानगिरींचे वस्त्रे जाली आणि कितांब राजे प्रतांपवंत बहादुर ते दिवसापासोन निज्यामअलीखां सरदांर गादीवर बसले सलाबंत जेंग मोगलअलीखां कैद जाले कलम

सन ११६९ फसली

१ मल्हार होळकर याची पूर्त्रोतर पासून श्रीमंताची सरकारातून नाइतेफाक चित सुद्धता नव्हो (९२) ती ते गायकवाड याचे मारफातीने त्रिंबकावर सलूक होऊन भेटी जाल्या

१ सिंद्याचे दवलतीत खासा नव्होता बाया मात्र सकूबाई भागेर्थीबाई व सगुनाबाई अशा होत्या मुलकाचा फौजेचा कारभार दोनतीन वर्शे रामचंद्र बाबा शनवंई याजवरच होता दादासाहेब याचे चितात कीं दत घ्यावा तेव्हा नाना फडनवीस व महादजी सिंदे याचा स्नेहे भारी ते वेळेस नानाणी दादा-साहेबास विंद्री करून पाठविल बाबा याहास सरदारीची वस्त्रे देवीली तो उपकार नानाचा मानिलेवर आहे कलम

१ राजे रामचंद्रराव जाधोराव मोगलाई कडील विठल (९३) सुंदर याचे सल्हेत हैदरजगाचे वळेस नव्होते तो कसूर धरून जाणोजी निंबाळकर याची त्याची आगांडीची कटक होती ते नंमूद करून त्याची याची लढाई लावली आणि मुलुक जप्त केला तेव्हा निंबाळकरानी जाधोराव यास लुटले जाधवराव पळाले तेव्हा तीन लक्षाची जात जागीर मात्र ठेवली बाकी जप्त केली

१ दादासाहेब व सिंदे होळकर गायकवाड वगैरे बंगाल्यात रघोजी भोसले याजकडे गेले ते हे मिळोन गढेमंडळचे पारपत्य करून कांहीं मुलुक घेऊन बंगाल्या पावेतो काही मुलुक आणि पणासा लक्ष्याचा मुलुक नवा साधिला तो भोसले यास दिल्हा पूर्वी करोडींचा हो (९४) ता आता दीड करोडींचा सर-जाम आला आखरसाली देसी आले रघोजी भोसले आखर जाले मुधोजी राजे यास वस्त्रे पाठविले कलम

१ दादासाहेब नागपुराकडून येताना धोडोराम यास पत्र पाठविले आणि मुकाम माहोरावर केला हौदरजेगाणी पासंष्टी लक्षाचा मुलुक घेतला तो घ्यावा नाहीतर आम्ही घेतो त्याजवरून वकीलाणी मजकूर विठल सुंदर यास कळविला त्याणी उतर सामोच्यारे केलेली म्या काही घेतला नाही माझे कारभास दोन वर्शे अद्याप जाले नाहीत हैदरजंगाणी घेतला त्यास मी कामात आहेतच तेव्हा युक्तीणे

मुलुकही देईन तूर्त लढाईचा प्रसंग (९५) न घालावा याचे उत्तर येतो पावेतो मुकाम माहोराक्रच होता मग तैसे लिहिले आले तेव्हा स्वारी पुन्यास आली

१ सन ११७० फसली

१ कर्नाटकात खडंणी महालो महाल पूर्वी होती तैसी हौदर नाईक याणी एक लाख देत जाऊ म्हणौन ठहराविला आणि अखंड जमीदाऱ्या मोडल्या

१ अनवरदिनखा आरकाटचे सुभे चेनापटणास राहतात याचे चिरजीव माद अलीखा उर्फ बालाज्याहा नबाबाचे चाकर अनंवरदीनखा होते त्याणी काही पायरीस पाये लाविला नाही नबाबांसी रुजू होते त्याचे माघे माद अलीखा याणी काही नबाबास माणीले नाही — कलम (९६) आपणच तिकडे मालक जाले होते त्यासी व फरांसिसासी हमेशा कटकट होत होती याज करिता कलकत्त्यास सेद जंबारखा व संतुकराये पाठवून दोन पलटणे चाकरीस आणविली दोन लाख रुपये नगदी दरमाहा देत जावे करार करोन चिणापटनास आनाविले इग्रजाचा पाये सिरला या पूर्वी त्यास दक्षनेत बसावयास ठिकाण एक मुंबई होती हे दुसरे ठिकान जाहले पूरवी मुंबई इंग्रेजाचे चाकर हफसी होते त्याचे सरजामात होती तेव्हा हफशाचा सरदार मकेस गेला तेथून इग्रेजाणी त्यास जाफ्त केलां व तिकडे चीजा नानाप्रकारच्या देऊन खुश केले (९७) तेव्हा हफशासी म्हणो लागले की आम्ही चीनच्या जिनसा आणु परंतु आम्हास माल ठेवायास जागा नाही मुंबई बेट द्यावे ते मालिक हफसी जबरदस्त होते त्याहापासून मुंबईत सवंदागर साहेब राहात होते सरदार जमियेतवाला साहेब आता चिणापटणास सरदार आला तेव्हा दक्षनेंत पाय सिरला जानावा

१ सन ११७१ फसली

धोंडीराम यास पत्रे सरकारची जातच होती की पासष्ट लक्षाचा मुलुक घ्यावा तेव्हा विठलसुदर देतो म्हणौन बोलत गेले साल मजकूर काय जाहले दादा साहेब यास सरदारीवाले समस्त (९८) राजे रघोजी भोसले यासी पैक्याचा भ्रम भारी करोडी रुपये भोसले यास कर्ज मागीत होते ते हुजरे जाऊन बसले त्या अक्षेने जाणोजी भोसले यासी मुधाजी बाबास सनंद दिल्ही की आपण नवाबासी पयेगाम बांधून ते आपण येक होऊन पेशव्यासीं लढाई घेऊन पुने लुटू ते जे पैका मागतात हा सिबंदी खर्च करु त्यास पैसा देऊ नये याचे पोटी जे होईल ते हो हा नेम करुन नवांबाकडे पयेगाम बाधला विठलसुंदर याचे चितात ही गोष्ट होतीच ते ज्याहादार तशांत हे ही सामीं (९९) ल जाले त्याजवरुन नवाब निज्यामअलीखा यास मजकूर समजाविला त्यास हे

वाटले की जैसे हौदरजंगाचे पारपत्य केले असे येश आले तैसे हे ही होईल आशा सुटली रुकार देऊन फौज तयार करविली उमगले थोडोराम रोज च्य पोटाप्रमाणे विठलसुदर यास बोलायास गेले याणी साफ जेबाब दिल्हा की आम्ही मुलुक देववयासाटी दाबिला नाही फार तुम्ही लढाईचे भये दाखवाल तर आम्हासही लढाई घेने जरुर अथपर ही गोष्ट काहडीत न जावी असी जबरदस्तीचे उत्तर जे जाहले हे येकून हे जबरदस्ताचे वकील होते उतरास प्रतिउत्तर (१००) देऊन भोसले हे येक जाहले ही बातणी अवंगड कळल्यावर अवघा मजकूर दादा साहेबास राग यावयाजोगा लिहून पाठविला पत्र पाहाताच दादासाहेब खफा होऊन फौजची तयारी मांडली होळकर सिंदे गाईकवांड याजला बोलावून आन-विले भोसल्याकडे हुजरे गेले होते मा। निलेनी उठाने दिल्हा

१ सन ११७२ फसली नबाबांची सवारी हायेद्राबादे हून कूच करून गोरदपवाडीवर मुकाबिला तीन दिवस होत होता सेवटी पेशव्याचे फौजेने वाट खाली नबाब निज्यामअलीखा याणी नीट पुन्याचा रस्ता धरला पुन्यास जाऊन काही घर (१०१) लुटली व काही आगी दिल्हया काही खंडणी ही घेतली तेथून नाशकास आले तेथेही ऐसाच उपद्रव केला तेथून कायेगाव टोके लुटले येशव्याणी दवंडीहून निघाले ते अवरंगाबादेस खंडणी कासम सुभेदार होता त्याज-पासी बारालाख रुपये घेऊन हायेद्राबादेकडे चालले ते याचे वर्तमान आले विटल-सुदर जालितो आणि लुटितो त्यास याचा बदला करावा तेव्हा मल्हारजी होळकर म्हणाले कीं विटलसुदर फारच चहडला आहे शहेर जाळल्याणे गरीबाचा मात्र नाश होईल त्याचे पारपत्य होये ते करावे त्याजरून दादासाहेब बोलले की लढाई कडवी घ्यावी बोलणी होत होती तेव्हां सुभेदार बोलले कीं कडवी लढाई जाली तर नाश दोघाचा होईल येश अपेश ईश्वराकडे त्यात तुमची व त्याची चो (१०२) ळीदामनाचा लेखा लिहिले पुसले आहेत हा जिकर भारी असला तर आपले नवाबाचे दोन्ही दवलतीस अपाये करील याचेच पारपंत्य होये येसी सल्हा काढावी कोन्हास उत्तर सुचले नांही सुभेदार बोलले की आपण स्वस्थ असावे याचा पयेगाम करीतो तेव्हा भालकीवर वीस मुकाम जाहले सुभेदार याणी आपला वकील नवाबाचे लस्करात पाठविला त्याणी मुरादखा पाच हजार फौजचा सरदार होता त्याची भेट घेऊन फितुर केला पाच लाख रुपये विटल सुंदर याचे डोंकसे मारिले म्हणजे द्यावे ऐसा करार मुरादखांने सांगितले तुमची फौज येऊ देणे लढाई लागली म्हणंजे हा योग घडंल ऐसी वकीलाची पत्रे आली तेव्हा

भालकी (१०३) हून माघारा फिरले नवाब विठल सुंदर टोक्यावर गंगा उतरुन अलिकडील काठाने चालले तितक्यात गंगेस पाणी आले की जलद येणे याणी तुळजापुराहून कूच केला ते दुसरे दिवसी धोंडी तीरास आले नवाबाचा मुकाम राक्षसभुवनावर भोसले समागमेच होते श्रीमंताची सवारी फौज आली म्हणोन भोसले याजला कळताच आधी गंगा उतरले पेशव्याणी येताच लढाईचे तोंड लाविले लढाई सरु जाली दोन दिवस तोफा गोळयाची लढाई जाली आशाडांचा महिना मोगलाईचे फौजेस मागे पुढे सरावयास जागा नाही तेव्हा तिसरे दिवशी लढाई कठिण तलवारीची जाली लोक हातघाईवर आले तव्हा दादासाहेब याचे हाती भोवता वेढा मोगलाई फौजेचा पडला रा (१०४) णोजी घांडगे याणी तलवार तेच वेळेस केली तेव्हा हरकारे याणी सुतरनाल मध्ये घातल्या तेव्हा हाती भोवता सरजाम मोगलाईवाला होता तो वितळला हाती मोकळा जाहला इतकियात सरकारच्या पांगा वगैरे दहा पधरा हजार सरजाम नेमला तिकडे मुरादखान यानी काये केले की प्रतापवंताचे हाती भोवंती जमियेत खासगंत मवसूफ याची होती येक बारगीर यास सागोन ठेविले की येथून हाती प्रतापवंताचा हालला म्हणजे बाजूस होऊन बेलाशक बारजोड गोळयाचा बाजारवाट नेम करून आपण राज्याजी जवळ आले आणि बोलले की मऱ्हटे याचा हाती सापडला आहे तेथे तलवार चालत आहे आपला हाती येथून पुढे चा (१०५) लला म्हणजे राघोबादादाचा हाती सापडला आहे पाडाव होतो आम्ही घोडे घालितो राजे विनायकदास मा। निलेचे पुतने हे घोड्यावरच होते ते दोन हजार पठानांसी महादजी सिंद्याचे तोंडावर उठावले पठानानी तालवार भारीच केली सिंद्याकडील तीन सरदार हाजार बारासे सवार मारले सिंदेवाले याणीही पाच सातसे पठान व विनायेकदास याचे डोकसे कापून गरदी अेकच जाहली इकडे प्रतापवत याचा अऊडभर पुढे ढळला व इतकियात जोड गोळयाने प्रतापवंताचे डोकसे उडाले दोन डोकसी दोन्हीकडे कापल्याणे गरदी येकच जाहली मोगलाई लस्करास पळावयास जागा नाही मागे गगा पुढे लढाई गरदी होताच निज्यामअलीखां यास अष्टीवाले जाहांगीरदार याणी दोनसे स्वारानसी गंगा (१०६) उतरुन अवरंगाबादेचा रस्ता धरिला होळकराची फौज दाहा पाच हाजार नवगावर गंगा उतरली ती पलीकडेच होती त्याणी निज्याम अलीखा यास अटकाविले होळकराकडून फितूर होताच विठ्लसुंदर मेला विनायेकदास मेला निज्यामअली पळाले ही अवघी बातणीच त्यास होती ते समई आपले सरजामास सागोन

पाठविले की नवाबास जाऊ देणे त्यास उपकार दाखविला भोसले पलीकडे आगाडीसच होते नवाब गंगा उतरताच भोसले याणी नागपूरचा रस्ता धरिला इकडे गरदी जाली तेव्हा जो हुशार सवार जरबंद कापून गगेंवर धोडे घातले जो गाफील तो जेरबद्र कापावा यास अवसर नाही तसाच गगेंत सिरला असे दहा-वीस हजार सवार (१०७) सुधा गगेंत बुडाले नवांबाचे फौजचा असबाब खाशासुधा गणीमवाल्याणी लुटला मनस्वी धण लोकाहीस सापडली दूरला सवार जो होता त्यास होळकराचे सवार लुटीत मुरादखा असबाबसहितसुधा होळकराणी रस्ता दिल्हा ते संगमनेर गावावर गंगा उतरून अवरंगाबादेस गेले कार्याकारण फौजही आपले लगाने असबाब चालला आहे तर न कळे बाकी जीव घेऊन वाचले ते अवरंगाबांदेस गेले या बेटचे गाव व त्या बेटाचे गाव ते वेळेस अभर जाले सारांष सलतंन नवाबाची सारी बुडाली हेही गंगा दोन तीनि दिवसानी उतरून अवरंगाबादेस वेढा घातला तेव्हा नवाब निज्यामअलीखाबहादुर याणी कृष्णराव बलाळ वकील याचे हातानी तह केला पासष्ट ल (१०८) क्ष्या रुप-याचा मुलक दिल्हा कृष्णराव बलाळ यास बहुत बहुत अर्जुनी नवाब बोलले की आमचे भाऊ आहेत राव पंडित प्रधान याचे फौजचा कूच करावा त्याजवरून कृष्णराव याणी मधे डवला मिरवून दादासाहेब व रावसाहेब यास समजाविले की नवाब आपण येकच दरमियान विठलसुंदर याणी वाकडे आणिले याणे दवलत गारद जाली आता पासष्ट लक्ष्याचा मुलुक आपणास आला त्यास आपला काही उपकार ठेवावा तेव्हा दहा लक्ष्याच्या ज्याहागीर नवाब संनदा करून देविल्या आपण नवाबापासून गणेरी ज्याहागीर मेळविली श्रीमताची सवारी अवरगाबांदेहून पुन्याकडे चालले होळकर या (१०९) चा उपकार थोडासा होता तो सरजाम याणी अडविले पुन्हा जाऊ दिल्हे त्याजवरून अंबडच्या संनदा आहेल्याबाईस चोळी म्हणून दिल्ह्या तेव्हापासून होळकर याचा वकील नवाबापासी राहू लागला नाहीतर याचे वकीलाचे कारण नाही फितुरापासून प्रारंभ राक्षेसभुवनाचे येश याप्रमाणे आले कलम

१ सन ११७३ फसली

१ माधोराव साहेब जातीने कारभार करू लागले कृताकृत दादासाहेब स्वाधीन काही नाहीत कार्याकारण बदोबस्त करीत चालले

१ हिदुस्तानातून पत्र व सनंद होळकर बुंधेल याची आली की नजीमखा दिलीत वजारतीचे काम करितात शाहा (१०९) १०८ आलम बादशांहा यास

माणीत नाहीत व आपली खंडणी राजे रजवाडे याजकडोन येणे त्यास सालमज. कुरी अटक केली आम्हास अैवज द्यावा राजे शाहुवाले दक्षेनचे यास अैवज न देणे बाहेर निघणार त्यास आपली सवारी इकडे यावी असी पत्रे आली— कलम

१ सन ११७४ फसली हिंदुस्थान रवानंगी नजीमखांनावर सरदार रामचद्र गणेश कारभारी व विसाजी कृष्ण यास बरोर फौज चाळीस हजार देऊन रवानंगी केली दादासाहेब याचे चितात की त्रिबकराव मामास पाठवावे तो राहून या उभये- तास पाठविले दरमियान यासी व त्यासी बनना तेव्हा रामचंद्र गणेश जेवाइयास बोलाऊन घेतले विसाजी कृष्ण सरदार व दिवान तेच पुढे गेले सिंदे होळकर (११०) व गोविंदपंत बुधेलेही येऊन मिळाले

१ सन ११७५ फसली

१ हौदर नाईक याजकडील खंडनी सुरलीत येईना जाणून पुन्याहून सवारी रावसाहेब याची निघाली व नाईकही तिकडून आले यांची व त्याची लढाई जाली हायेदर नाईकाणे कच खाली पळू लागले पळता पळता तुंगभद्रेने वाट नायेकास दिली मागून रावसाहेब गेले नदीस उतारा नाही जलदच होते तैसेच घोडे ढकलले हजार दोन हजार घोडी जाया जाली परंतु नाईकास घेरून खंडनी चिंनापटंणाहून नव्ह लक्षाचा मुलुक घेतला वरकड तमाम खंडन्या सर्व स्था- नांत घेऊन पुन्यास आले— कलम (१११)

१ येके दिवसी पर्वतीवर बसले होते खाले हातीची लढाई लाविली होती त्यापैकी एक मस्त हातीने चाल केली रावसाहेबाचे जवळ यावयास लागला कितीक लोक त्यास उठा म्हणौन बोलले तेव्हा काही उठलेच नाही से पनास खासे जवळ होते त्यातून आपाजीराव पाटनकर व खडेराव दरेकर दोघे उठोन पुढे होऊन हातीस सागाड मारल्या बोवा माहोत वर बसला तो घाबंरला हाती काही आवरेना तेव्हा त्यास या उभयेताणी सागितले की दुशाला डोळ्यावर टाक आणि दाभा- डांत अंकुश घालोन मागे वढ आम्ही सांगोन मारून डोंगराखाले घालू तव्हा बोवा माहोतानेच तैसेच केले आणि हाती माघारे माणूस जाया न व्हाेता नेला तेव्हा रावसाहेब सतोष होऊन आपाजीराव पा (११२) टणकरास जात जागीर देऊन मानकऱ्यात असामी लिहिली बोवा माहोतास पागा दिल्हीं खडेराव दरेकर यास लस्कर सागितले जरी पटका दिल्हा पूर्वी लस्करास निशान नव्होते मामले लस्कर

जाणोन त्याचे नाव लस्कर आता जरीपटका दिल्हा तेव्हा मानकरी वगैरे तैन तीस जाऊन मागतील असा नेम ठहरला कलम १

फसली सन ११७६

१ दादासाहेब याचे चितात की आपणास पुत्र नाही दत घ्यावा राव साहेबाणे सागितले की नारायेणराव आहे यास दत घ्यावे त्याचे चितात न आले त्याणे मेव्हन्याचा पुत्र आणून अमृतराव दत घेतला तव्हा कळीस आरभ जाला कलम

(११३)

१ मल्हारजी होळकर आखर झाले म्हणौन इसाजीपंत यास पत्र आली त्याजवरून रावसाहेब यानी तुकोजीबावास वस्त्र सुभेदारीची पाठविली—कलम

१ सन ११७७ फसली मुधोजी व साबाजी व जाणोजी व बिंबाजी भोसले चौघे भाऊ याणी राक्षेसभुवनाचे सवारीस फंद करुन निज्यामअलीखांन यास मिळाले हे मनांत होतेच त्याजवरून रावसाहेब याची सवारी उमरावतीवर आली तिकडून भोसले भेटीस येतो करोड रुपये खार्चासही देतो असा करार करुन नागपूर सोडून अलिकडे आले त्याचे याचे अंतर पाच पचेवीस कोसाचे राहिले तेव्हा भोसले याचे काय मनात आले असल ते नंकळे माघारा फिरला तेव्हा रावसाहेब त्याचे मागे लागले वीस वीस कोसाचा रोज कूच असा (११४) येक महेना फिरत होते सेवटी रावसाहेबच हरले सलूक करीनात तेव्हा दरसाल पाच हजार फौजेने बारमाह चाकरी करावी पधरा लाख नजर दरसाल द्यावी करोड रुपये रोख घ्यावे असा नेम ठहेरला तेव्हा सलूक करून भेटी होऊन स्वारी माघारे आली हुजूर उठविले या अकसीने चाकरीवर नजर दरसाल मागे लागली पूर्वी नव्हती —कलम

१ सन ११७८ फसली

भाऊसाहेब व तोतिया व त्याचे कारभारी जोतीपत उभे राहिले ते कैद करून किल्यावर ठेविले तोतिया किल्यावरच मेला आणि जंगलचे स्वारीस राव-साहेब गेले होते तेथे नारायणरावसाहेबास गोळी लागली तेथील पठनास मान देऊन आणिले होते येके दिवशी (११५) लस्करात कोन्ही लटकीच आवई घातली की पठानास लुटले हे त्याजवरून दोन प्रहराची वेळा तमाम पटन लुटले ते बांतणी रावसाहेबास कळली ते म्हणाले की मजला ठाऊक नाही नस्ता कोणी लुटले त्यास वचेन देऊन आणिले असा बेकैदी जाली त्याजवरून मुनांदी

मिरवली की जपासी पठानाची चीजबस्त निघेल त्याचे हात कान तोडू स दोनसे सापडले त्याचे हात कान घेतले त्या दाबानें पठानाची चीजबस्त सुतलीचे तोडच्यासुद्धा आली असा बदोबस्त दाब बसला इसाजीपंत बिनिवाले हिंदुस्थानात गेले तिकडे जाऊन सिंदे होलकर नेमून दिलीकडे गेले आलीग उर्फ शाहाआलम यास नजीमखा मानीत नव्हता बादशहाणे दिलीहून गछे करू (११६) इसाजीपत याचे लस्करात आले त्याणी त्यास नजर वगैरे देऊन इतमानाने होते ते नजमिखांस बातनी समजल्यावर तोही बाहेर निघाले याची त्याची लढांई जाली ते पुढे हे मागे असे फतरगंडा पावेतो गेले तेथे लढाई मातंबर जाली नजीमखां व त्याचा लेक थोरला कालेखां असे आखर धाकटा लेक अफतेखा व कालेखानाचा लेक गुलाबकांदरखा याचा शोध विसाजीपंत याणी असे दोघे वाचले याणी ही दुसरी लढाई विसाजीपतासी घेतली दंम निघाला नाही पळून गेले लस्कर लुटले अफतेखा व गुलामकादर याचा शुमशोध इसाजीपंत याणी फार केला परंतु बातंनी मिळाली नाही शाहआलम बादशा गाजी यास विसाजीपंत याणी दिलीस आणोन बसविले तिकडून खंडण्या वगैरे तीनच्यार वरशं आ (११७) ल्या न होत्या त्या घेऊन बादशहाची (म. फा.) कसत घेऊन देसी आले सबब त्यास जात जागीर राक्षेसभुवन तालुका दिल्हा—कलम

पुन्यात नारायणपेठ वसविली प्राचीन नव्होती

१ सन ११७९ फसली

१ नवाब निज्यामअलीखा याचे दिवान रुकनतदवला व धोंडोराम वकील पुन्यास आले होते भेटी परस्परे होऊन माघारा केले—कलम १ महमदअलीखा उर्फ वालाजाह याणी दोन पलटणे अग्रेजाचे सवारीस ठेविले होते त्याची काही तलब चहडली त्यावेळेस गस्त सरदारी म्हणौन चालीस पनांस लाख रुपये कर्ज घेतले असा अकंदर भरना करून रोकड रुपयाचा मुलुक मुलुक रतकर्ज लाऊन घेतला तीन लाख रुपये (११८) दरमाहा उचक खर्चास म॥ द अलीखा यास देतात काही येक दिवस तोही मिळनार नाही सर्वस्थान डंफगन्यात आले—कलम

१ सन ११८० फसली

राणु रावसाहेब याहाची सवारी मलकार्जुनाकडे गेली तमाम खंडन्या घेतल्या तेथे तिकडील कळवातीनींचे दुखं भरले नंतर देसी आले

१ सन ११८१ फसली ता॥ सन ११८२ फसली

१ रावसाहेब याणी नारायेणरावसाहेब यास सागितले की दादासाहेब याहाचा आट तुमच्यानी निघनार नाही माझा काही भारोसा नाही त्यास तुम्ही बां।। र फौज देऊन हिंदुस्थानास पाठविले म्हणजे तुम्ही राजे स्वस्थ कराल नाहीतर चैन पडू देनार नाही—कलम

(११९)

१ नानासाहेब व भाऊसाहेब याचे कारकीर्दीचे कर्ज सरकारवर होते ते हाली माधोरावसाहेब याणी मुदल वरले दोन कोटी पच्यासी लक्ष सावकारास दिल्हे आणि रोखे घेतले—कलम

१ आपण याजकडे मुलुक सिंदे होळकर गाईकवाड व भोसले सुभे किती याची खातरजमा करविली तेरा चवंदा करोडींची बेरीज आली

१ माधेराव साहेब याहास देवआज्ञा आली रमाबाईनी सहगमन केले नारायणरावसाहेब गादींवर बसले

१ सन ११८३

नारायणरावसाहेब याजवर गर्दी सनंवारचे दिवसी वाड्यांत जाली कारण की मां।। र (१२०) निले रावसाहेब मेल्यावर काही अेक दिवस दादासाहेब याचे खर्चवर्च आनविला त्याप्रमाणेच चालले नंतर नाशकास गेले तिकडे मातोश्री गोपिकाबाई यास भेट जाली याणी दादासाहेब प्रकरणी समजाविले त्याजवरून पुन्यास येताच त्याचे खर्चवेचाची बंडाले कयेदीमानसांसारखे ब्राह्मणदेखील तिकडे जाईना अैसी तकडबंदी जाहली सखाराम भगवंत याचेही अैकीनात तेव्हा याणी त्याणी सेनापत्रे केले सुमरसिंग याजकडून धरावे धरावयाचा आनंदीबांईने अमृतरावं (१२१) ल्हांण होते त्याजकडून करवून सुमरसिंगास दाखविले नारायणराव यास मारावे या सल्हेत सखारामबापू आहेत त्याचेही सिक्यापत्रावर सही आहे ही पाराबाबी गार्दी याणी अक्षरे पाहून उद्योगास लागले होळकर कोन्हास काही कार्तिकमास मगळवार होता पर्वतीस गेले सुमारसिंगाणी हाजरी द्यावयाची म्हणोन लोकास सांगोन लोक तमाम वाड्यात समजत चालले हारी बलाळ खवासीत होता त्याणी नारा (१२२) येणरावसाहेब यासी तिकडून येताना विच्यारले की आज गारद्याची हाजंरी आहे की काये ते म्हणाले की काही सागितले नव्हते आणि सवाल हरीपंत बोलले की आपणास माहीत नाहीं तेव्हा इतके मंडळ वाड्यापासी मिळावयाचे कारण काये याची चवकशी करावी रावसाहेब बोलले की मला डुलक्या येतात अमलसी

निजंतो नतर चवकशी करीन हरीपंतानी इतके सागितले की अगोधर चवकसी करावी नंतर जावे बरे आहे म्ह (१२३) णोन बोलले आणि वाड्यात गेले हरीपंत वगैरे आपले आपले घरास गेले गंगाबाई साठ्याचे घरी भोजनास गेली होती हे जाऊन निद्रां केली तो सुमरसिंग वाड्यात आला चापाजी टिळेकर हुजऱ्या होता गरबंडीची बातंनी समजली तुक्या पोपावाड हुजऱ्या फितुरात होता चापाजीने रावास उठविले आणि बातंनी सांगितली आणखी म्हणाला की पळून नानाचे वाड्यात जाऊ तैसीच खिडकी उघडून जाऊ चालावे काळाने वहडून राव बोलले की तू बोलतोस हे चागले नाही आता दादासाहेबाकडेस जावे तेच वांचवतील इतकियात कवाडाजवळ सुमरसिंग (१२४) आला कवाड लाविली होती तुक्या पोवार कवाड मोडितो रावसाहेब दुसरे वाटेने च्यापाजी मात्र बरोबर मग कोन्ही नाही ते दादासाहेबाकडे आले तो पोटात डोकी घांतली की प्रान वाचवावा ये मागे सुमरसिंगही आला दादासाहेबाणी काही म्हणाले परंतु तेव्हां अैकतो कोन टाग धरून वोढिला चापाजी अंगावर पडला सुमरसिंगाने वार दोन चाल विले त्याचे दोघे पुरे जाले ही गलबल बाहिर समजली जेवतराव नानाणी गंगाबाईस साठ्याचे घरीहून आणोन आपले वाड्यात ठेविली त्रिबकराव मामाणी तोफा काहाडल्या गढीकडे आनिल्या सखारामपंतबापू व मोरोबादादा व नानाचे पागेपासी आले की गलबल कशाची आहे गोळीही वाजली दोन तीन बार ठोकले तो नानाही मागून आले बापूनी नानास म्हणाले की गर्दी काही चागली नाही कोनास माहीत नाही रावसाहेब धरन्याची सलाह कोन्हे दिल्ही गुजरात रीतीने रडू लागले इतक्यात नानापासी सिकापत्राची नकलच आली नारोबादादा अमल भोळवट होते नानाची हुशारी भारी नानानी बापूस उत्तर केले की काय जे जाले असेल ते आप (१२६) ले सल्हेसिवाये होनार नाही आम्हास काये विचयारिता नाना त्याचे अगीं लावित बापू नाही म्हणेत अैसेही क्षेनभर जाले नाना बोलले असो जे होनार ते होईल आतून बातंनी तरी आनवावी काये आहे तेंव्हा बापूनी खिद्-मतगार आत पाठविला त्याची बातनी आली की रावसाहेब तर पारच जाले तेव्हा सखारामबापू आपले चितात साचले की धरन्यांचा मनसुबा होता आणि लागलाच मारला हे काही चांगले नाही बापू आपले ठिकाणी बांतनी आल्यावर दंग जाहले नाना म्हणाले की दंग का होता अैसे बोलतां बोलता पागेपासी नाना (१२७) बोलले की आपणच करविले आता श्रमी न व्हावे क्रम चालो द्यावे बापू म्हणाले की हे काही मजला माहीत नाही नानानी कानासी सागितले की तुम्हीच करविले

तुमचा रुकार सिकापत्रावर पाहावे ते पाहून बापू कायेळ जाले नानास म्हणाले की गोष्ट न फोडावी चुकली खरीं आता दुसरा नक्ष्या ठहराऊ उद्ईक तुमचे वाड्यात येईन हे बोलल्यानंतर नानानी हे प्रकर्ण टाकिले बापू व नाना म्हणाले की रावसाहेब याहास दहनं (१२८) करवावे ये विषयी दादासाहेबाची परवानगी आनावी गारद्यासी कांहीं द्रव्ये देऊ केले होते ते दिल्हे तेव्हा बाहिर निघाली यास च्यार सहा घटका रात्र जाली बापू म्हणाले कीं त्याजकडे शहाना मनुष्य कोन पाठवावा तेव्हा गंगाराम भगवंत व मोरो गिरमाजी दिमत उचखानास या दोघास पाठविले की याचे दहनाविषयी काय आज्ञा दादासाहेबाणी बापू नाना व दादा वगैरेस सागून पाठविले की असे नव्हे त्याचे दैवाने अंगर आमचे दैवाने गोष्ट जाली आता दहन करवावे इतके रात्री (१२९) स दहन केले —कलम

१ सखाराम बापू दुसरे दिवशी नानाचे वाडयात प्राथकाळी आले नानास म्हणाले की धरावे ही सलाह माझी मारावे ही सलाह माझी नाही अक्षरे कोन्ही ही 'धं' चा 'मा' केला हे न कळे नाना म्हणाले की आता याची सलाह काय बापू बोलले कीं गंगाबाई कोठे आहे तो पावेतो बापूस गंगाबाईची बातंनी नव्हंती नाना बोलले की बाई येथे आहे बहुत चांगले आहे बाई गरोदर आहे काही चिंता नाही तुम्ही राज्या (१३०) कडील इलाकेदार आहांत मी त्याची चाकरी त्यास सरदार मानकरी व पांगे चागले पाहून तुम्ही फोड करावी वेगळा अैवज लाऊ तूर्त तुम्ही नमूंद न व्हावे व त्रिंबकरावमामास पुढे करावे आंतून तुम्ही तुम्हाजवळ मी जे तुम्ही कराल त्यात मी आहे अैसे बहुता प्रकारे बोलणी उभयताची जाली नानानी उतर केले की मी इतकेही करीन परंतु आपला भरवसा मला येत नाही तोडघंसी घाल अैसे न व्होये तेव्हा बापूनी नानास इमान उचलून (१३१) दिल्हे नंतर गंगाबांईचे या त्रिवर्गाचे इमान जाले अैसे होऊन बापू आपले घरास गेले तिकडे दादासाहेब याणी कचेरीची बातंनी आनविली तो दरबारास मुतसंदी कोन्हीच नाहीत बापूस बोलाऊ पाठविले बापू गेले मागून मारोपंतदादाही बोलाऊन नेले उभेयतास दादासाहेब म्हणाले की गोष्ट तर चुकली आता पूर्वताप्रमानें गाडा चालू द्यावा बापू म्हणाले की आम्हास काये उभयेता मालक (१३२) आहा कोन्हाचीही चाकरी करावी नानास बोलाऊ पाठविले नाना आले नाहीत उत्तर आले की दादा आहेत तेथे मीच आहे आज प्रकृती स्वस्थ नाही बापूस दादासाहेबानी म्हणाले

की ते संवशई आहेत त्याची खातरजमा करुन घेऊन येतो चिंता नाही ते आपले सिवाये नाहीत वरकड लहांण थोर यास आणोन त्याची खांतरजमा केली तिकडे नानानी त्रिंबकराव मामास बोलाऊन आणून त्यास मजकूर सागि (१३३) तला कीं बापूचा आमचा असा बेत जाला आहे तुम्हीं बाईस घेऊन पुरंधरास जावे संमागमे हरीपंत यास दिल्हे मागून येतील ते तुम्हाकडे पाठवू मामापासी पंचवीस हजार त्याचे हुकमानसी जमियत देविली तेच दिवसी बाईस घेऊन गेले किलेदारास नानानी व बापूनी पत्र दिल्ही किल्यास दाखल जाले ही बांतनी बाई व मामा गेल्याची दादासाहेबास लागली फितूर होन्यास करिता बापूनी सागितले की आपणाजवळ आहेत एक मामा नसल्यस याणी काये (१३४) करन्याचे आहे त्याचाही बंदोबस्त करू नंतर नानानी काही पागे व मानकरी दाहापाच याचे मिळणीत यावयाचे त्यास बोलाऊन आणोन खातरजमा करुन त्यास मामाकडे पाठविले महादजी सिंदे व तुकोजी होळकर याचे अणुसंधान नानाकडे ही बांतनी कारयाकारण मजकूर मोरोबादादास समजाविला रामशास्त्रीस दादासाहेबाणी प्रायेचित्ताचे विच्यारिले त्यास त्याची याची बोलाचाली जाली ते बाईस गेले इकडे नवाबाणी पंचावन लक्षाचां मुलुक दाबला बारा दिवस रावसाहेब याचे जाले आणिक नानास (१३५) बोलाऊं पाठविले नानानी जेवाब दिल्हा मंग मोरोबादादा येऊन नानास घेऊन गेले त्याची खांतरजमा दादासाहेबाणी केली नंतर बेदरावर आले ही बातणी यास समजल्यावर याणीही कूच केला तिकडे मामाणी पंचेवीस हजार फौज नवी ठेविली बेदरावर सखारामबापू व नाना व दादासुद्धा आहे बेदरचे दान गावा फौज समे कारन नवाबाणी संदा पाठविल्या त्या माघार आल्या आणि त्यास इतके सागितले की गंगाबाई व त्रिंबकरावमामा याणी आट केला आहे त्यास तुम्ही सामिल न व्हावे मोगलाई कारखा (१३६) ना करून हीच पुरे उत्तम आहे अगत्य स्वागत्य जाले नानानी दुंखणे कहांडले निरोप मागितला मागून बापूनी व मोरोबादादाणी निरोप घेतला निरोप दोघास देत नव्हते चिंतोपंत दादासाहेब अतरंग कारभारी होते त्याचे तन्हे असले म्हणजे खडंत न होते ते जाणून त्यांनी बुद्धिवांद देऊन निरोप देविला ते तिघे पुरधरास आले तेव्हा दादासाहेबास समजले की नाना व दादाचा भरोसा नव्हता बापूचा भरोसा होता परंतु तेही तिकडे मिळाले मामाही पुरधराहून फौज घेऊन अलीकडे आले सिंदे होळकर याणी दादासाहेबास याचा निरोप हिंदुस्थानास जान्यांचा घेतला गंगा-

पावेतो गेले तेव्हा स्पष्ट फितुर समजला मामासाहेब व दादासाहेब याची लढाई पंडतूरपुराजवळ जाली नवी फौज होती कच खाली मामा धरले गेले कांही निकटीचे मानसे व हारीपंत किनारा घेऊन होते दादासाहेबाणी हिदुस्थांनाचा रस्ता धरला मामाची अप्रतिष्ठा फार जाली खडकतावर काळ जाला बापूनी व नानाणी ते वेळेस हरीपतास वस्त्र सरदारीचे देऊन फौज जमवून सिंदे होळकरही येऊन मिळाले पुढे दादासाहेब मध्ये नवाब मागे हरीपंत असे बुऱ्हाणपूर पावेतो गेले तेथून नवाब निज्यामअलीखां बाहादुर वराडांत गेले दादासाहेबाबरोबर जरीपटका होता व मानकरी पांगा वगैरे होते तितक्यावर सरमजामावर घरावर जप्त्या नानांनी पाठविल्या तेव्हा लोकानी अडविले की तुमी देसी चलावे हरीपंतास लुटू नानाचे पारपत्य करूं नाहीतर आम्ही जरीपटका घेऊन हरीपंताकडे जितके आले (ति) तक्याचया जप्त्या मोकळया केल्या सुमरसिंग तेथून फुटला शेवटीं दादासाहेब च्यार (१३९) हजार फौजनसी मानाजी फाकडे व रानोजी धाडंगे हे त्यात अग्रसेना इकडे गेले हरीपंत याणी सुमरसिंगास धरुन बोटास चिंध्या बांधून आणि आंग देऊन मारला तुक्या पवार यास नानानी धरुन हरीपंत देसी आले गंगाबाईचे नावे कागजपत्र चालू लागले माा द अलीखा उर्फ वालाज्याहा यास आग्रेजानी कैद केले मुलुक अगोंधरच र (म. फा.) (१४०) कर्जी घेतला होताच दरोबस्त चिनापटणासुधा अग्रेजी अमल

१ सन ११८४ फसली

१ सवाई माधवराव याचा जेन्म जाला तो आनंद बापू व नाना व दादास काये पुसावयाचे आहे सर्वत्रास खुसी जाली साकरा वाटल्या

१ नवाब याचे दिवान रकुनतद्दौला आलजपुराकडे गेले कारन नवाब जातीने धोंडो शंकर यास (म. फा.) विले घेऊन काम करून लागला हयेदराबादेस (म. फा.) दाखल जाले

१ माधवराव साहेब याहास जेवाहिर व वस्त्रें नवाबाणी नानाजीशंकर याजबाो र पााले ते वेळेस अखबारनवीसीचे कामावर पुरधरास नानाजीपतांनी हैयबतराव गोपाळ यास ठविले

१ सन ११८५ फसली

१ मोरोबादादानी फितुर केला कीं बापू व नानास धरून आपण कारभार गंगाबाईचा करावा अशी बातंनी नानास समजताच दादास धरोन नंगरचे किल्यात ठेविले

१ जिवाजी रघुनाथ यास हायेद्रा (बादचे वकी) लीचे कामावर पाठविले धोंडो (म. फा.) (१४२) घेतले मुख्ये वकील कृष्णराव बलाळ

१ सखारामपंतबापूकडे दादासाहिबाचे पत्रे साफच आली नानास दाखविली याचे उतरही याचेच समोर दिल्हे येसी एक दोन पत्रे (वृत्त) आली तिसर पत्र आले बापूचे उतर किंवा भिवराव पानसे लिहीत होते त्यात पत्रात लिहिले की तुम्ही इकडे यावे मी नानास धरितो हे अक्षरे बापूनी वाचावी ती न वाचोन तेसी विनंती करून दिल्ही ते पत्रेच नानाचे णिर्धर तु (म. फा.) जी सिंदे याजकडून बापूस (म. फा.) ठेविले कैद करावे ते वे (म. फा.) (१४३) ळस बापू बोलले की याचे कारण काये तेव्हा पाटील बाबानीं पत्रेच दाखविली याजवरून बापू बोलले कीं मला माहित नाहींत मग कोण येकतो किरकोल कोन्ही जीव दिले बाकी किल्यावर टाकिले हरीपंत तात्या व गणेशपंत बेहेरे...इकडे गेले तेथे दादासाहेबासी लढाई जाली दादासाहेब पळाळाले हरीपंत तात्याणी सामही करून पाहिला परंतु याचे मानस इकडे येयाचे नाही सुरतेस गेले बाहेर यास ठेवून तात्या इकडे आले

१ सन ११८६

हैदर नायकाकडे (म. फा.) याणी गेले (१४४) पत्र पाहता (म. फा.) आणि असावे (म. फाटला)......................
... (मजकूर फाटला) ....
करीत .... (म. फाटला) .... णी ....
हरीपंत तात्या ....
तणी लागले ....
दु ....
चवक ... .
यासी लष्क ....
हे अंग्रेजास ....
हैदर नायका (स) ....
वासवारी ....

बखरींतील कठिण शब्दांचे अर्थ

(अ.) = अरबी; (फा.) = फारशी

अ

अकसीनें (अ.), मत्सरानें; खुनशीपणानें.

अर्जुनी (अ.), सविनय.

अभर, अभ्र; ढग.

अमल ज्यारी करणें (अ.), अधिकार अथवा संप्रदाय रूढ करणें.

अवग्र, सगळी; समग्र.

असबाब (अ. अस्बाब), सामुग्री; सामान.

असील (अ. अशिल), मानकरीण दासी.

अक्षेनें (अ. अकसी), मत्सरानें; खुनशीपणानें.

अंतर, मनांतील आशय.

अंदेशा (फा.), संशय; विचार.

आ

आखर (अ.), अंत; निधन.

आट, अट.

आवई, कंडी; लोकवार्ता

इ

इजाहार (अ.), प्रसिद्धीकरण.

इतमानानें (अ. एहतमाम्), व्यवस्थेनें.

उ

उचल, उधारी.

उजागरीणें, उजळ माथ्यानें.

उठाने, उत्तेजन.

औ

औडभर, नांगरभर.

क

कटक, वैर; काट; मनांतील डूग.

कसूर (अ.), अपराध.

काबिल (अ.), कर्तबगार; योग्य.

कायेल (अ.), सहमत; निरुत्तर.

किताब (अ. खिताब), संबोधन; पदवी.

ख

खडंत, अडत.

खफा (फा.), रुष्ट

खातरजमा (अ.), समजूत.

खालशात (फा.) मुख्य सरकारची जमीन.

खाविंद (फा.) स्वामी.

खाशांत (अ.) विशिष्ट ठिकाणीं; एकांतांत.

खासा (अ.), मुख्य व्यक्ती.

खिदमतगार (फा.), सेवक; परिचारक.

खिलत (अ.), सन्मानाचा पोषाख.

खुदस्तबुनियाद (खुदस्तेबुनियाद), मुसलमानी राजवटींतलें औरंगाबाद शहराचें नांव; भाग्यशाली गोष्टींचा पाया असलेलें (ठिकाण).

ग

गछे, गमन

गणीम (अ.), शत्रु; मराठ्यांस मुसलमानांनीं दिलेलें नांव.

गर्दिश (फा.), संकटाचा फेरा.

गलबाल (अ.) धामधूम.

गस्त (फा.), फिरती.

गाफलीनें (फा.), गैरसावधपणानें; निष्काळजीपणानें.

गारंद (अ.), उध्वस्त; नष्ट.

गिलचे, गिलके; घोसाळ; घोष करणारा; आवाज करणारा.

गिला (फा.), तक्रार; ओरड.

गुजरात रीतीनें रडणें, खरें दुःख नसतांना कृत्रिमपणें आक्रंदन करणें.

गैरवाका (अ.), असत्य; जसें घडलें नाहीं तसें (सांगणें).

च

चालवनें, परामर्ष घेणें; अन्नवस्त्राची तरतूद करणें.

चेंडूली, सैन्याच्या पिछाडीची रक्षक फौज.

चोपदार (फा.), हातीं काठी धरणारा सेवक.

चोळीदामनचा, चोळी व तिची किनार याप्रमाणें संलग्नता असलेला.

ज

जगन्यात, जग जाहीर होणें.

जमियेत (अ.), जमाव.

जरजेर, जर्जर; घायाळ.

जर्जेर, ' जरजेर ' पाहा.

जरबंद (फा. जर्बंद), जीन आवळून धरणारा घोड्याच्या पोटाखालून जाणारा पट्टा.

जरीपटका, मराठ्यांचे छत्रपती राजाराम माहाराज यांच्या कालापासून माननीय झालेलें राष्ट्रीय निशाण.

जातजागीर (अ.), वंशपरंपरा नव्हे तर स्वतः पुरती मिळालेली जागीर.

जाया (अ.), घायाळ.

जिकर (अ. जिक्रि), प्रश्न; गोष्ट; कटकट.

जुजबी (फा.), साधारण; किरकोळ.

जेबाब दर जेबाब (फा.), उत्तर प्रतिउत्तर.

जोरतलबी (अ. जोरतलबी), आग्रहाची मागणी.

ज्याफती (अ.), जाफत; मेजवानी; आतिथ्य.

ज्याहादार (फा. जहांदार), जगताचा स्वामी.

ड

डवला, डौल; माडणी; ढब; दिमाख.

त

तकडबंदी, सर्वांगीण नियंत्रण.

तऱ्हे (फा.), एकटा.
(टीपः—प्रस्तुत बखरींत ज्या संदर्भात हा शब्द वापरला आहे त्यास अनुसरून या शब्दाचा अर्थनिर्णय 'बरोबर' 'संगतींत' असा लावतां येईल. परंतु मूळ अर्थ तसा नाहीं; 'बरोबर' 'संगतींत' या अर्थाचा फारशींत जो प्रतिशब्द आहे तो 'तऱ्हे' नसून 'तर्ही' असा आहे.)

तयेनाती (अ.), नेमणूक; पगार.

तलब चहडली (अ.), मागणी वाढली.
तसंदी (अ.), श्रम; त्रास.
तुटेफाटे, क्षुल्लक; तुरळक.

द

दरबार आलम (अ.), साधारण राजसभा.
दरोबस्त (फा.), पूर्ण; सर्व.
दाही, द्वाही; दवंडी.
द्वांमोशाचे, दुटप्पी; अस्पष्ट.
दिवाभीत, भित्रा; घुबड.

न

नकशा ठहेराऊ (अ.), योजना निश्चित करूं.
नजर (अ.), भेट; दृष्टी.
नमूद (फा.), प्रगट.
नाइतफाक (अ.), सलोख्याचा अभाव; असहकार.
नाहक (अ.), विनाकारण.
निछये, निश्चय.

प

पयेगाम (फा.), संदेश; निरोप.
पयेवरवी (फा. पैरवी), पाठलाग; खटपट.
पल्यावर, लांघणीवर.
पाराबाबी, विश्वसनीय (?)
पायेरीस पाय लावणें, आदरणीय वस्तूचा अपमान करणें.
प्राबले, प्राबल्य.
पुरावत, पुरावा.
पूरा जाला, मृत्यु पावला; निकाल लागला.
पूर्वांतर, पूर्वीप्रमाणें.
पेशकब्ज (फा.), कट्यार.
पोत्र्यास, नातवास.

फ

फंद (फा.), व्यसन; कुटिल कल्पना.
फुलची, पांदिचरी (Pondicherry).

भ

भरोभरी, उद्युक्त करणें.

म

मशारनिले (अ.), उपरिनिर्दिष्ट.
मंजुमदार (फा. मजमुयेदार), वसूलाचा हिशेब तपासनीस.
मातबर (फा.), विश्वासू.
मातंबरी (फा.), विश्वासू; समृद्ध.
मामलत (अ.), उद्योग; कार्य.
मामले (अ.), विषय; संबंध.
माहाल (फा.), तालुक्याचा पोटभाग.
माहीमरातब, एक प्रकारचा मोठा मान.
मिंजुमले (फा.), एकंदरीनें.
मुदबाखा (अ.), स्वयंपाकी; स्वयंपाक.
मुनादी (अ.), दौंडी.
मुपसंद, मुफसद (फा.), पुंड; बखेडखोर.
मुलतवी (अ.), पुढें ढकलणें; निरोधन करणें.

य

येलची (तुर्की एल्ची), वकील.

र

रतकर्ज (अ.), कर्जफेड.

रसदबंदी (फा.), धान्य, दाणा, वैरण इत्यादिकांचें नियंत्रण.

रसद, धान्य; दाणा; दारूगोळा; सामुग्री.

रुकसत (अ.), परवानगी; सुटी.

रुजुवाद (अ.), समक्ष ताडून पाहाणें.

रुजू (अ.), दाखल; निष्ठा.

रूबकार (फा.), सन्मुख; फलदायी.

रूबरू (फा.), समोर.

ल

लगा, सोईनें; धोरणानें; धागादोरा; सूत.

लवाजमियान, मोठेपणाचीं सर्व चिन्हें व परिवार.

व

वजारतीचें (अ.), प्रधानकीचें.

वाट खाली, कच खाली.

स

सफाई (फा.), समेट; तकाकी.

सरंजाम, साधन सामुग्री; निकाल.

सरेन, शरण.

सलतन (अ.), राज्य.

सलाह (अ.), योग्य हितवाद.

सलूक (अ.), सलोखा; सख्य.

सवदागर (फा.), व्यापारी.

स्वस्थान, संस्थान.

सागड, तीक्ष्ण टोक असलेली लांब सळई.

सानी (अ.), दुसरा.

सामोच्यारे, 'सामोपचार' याचा अपभ्रंश.

सिबंदी, शिबंदी; वसूलीच्या कामासाठीं ठेविलेली फौज; किल्याच्या संरक्षणार्थ ठेविलेली फौज.

ह

हजरत (अ.), राजा, पैगंबर, इमामादि वंद्य पुरुषांस या शब्दानें, स्वामी या अर्थानें, संबोधितात.

हायेरान (अ.), हैरान; आश्चर्यचकित, त्रस्त.

हवाल (अ.), अहवाल; वृत्तांत; हकीकत.

हिसका, हिसडा.

हुजरे, निकटवर्ती सेवक.

सूची

व्यक्तिनिर्देश

प

फ

ब

भ

म

य

र

स्थलनिर्देश

प्रकाशकः—**एम्. नसीरुद्दीन खान**, डायरेक्टर, दफ्तरे दिवानी मालें, हैद्राबाद सरकार, हैद्राबाद दक्षिण.

मुद्रकः—**केशव गणेश शारंगपाणी**, आर्यभूषण मुद्रणालय, ९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४.